**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ४६ | बुधवार,दि.२५ ऑक्टोबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# डीपीडीसीवर जि.प.सदस्यांच्या निवडीला आमदारांची आडकाठी?

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया-** जिल्हा नियोजन समिती सदस्यांच्या निवडणुकीची प्रक्रिया अद्याप सुरु करण्यात न आल्याने वर्षभरापुर्वी निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांना अद्यापही नियोजन समितीमध्ये पोचता आले नाही.२०20 पासून जिल्हा परिषदेचे सदस्य नियोजन समितीमध्ये नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या नियोजनावर विशेष निमत्रिंत असलेल्या आजी माजी आमदार व खासदारांनी आपले वर्चस्व दाखवायला सुरवात केल्याने जिल्हा परिषदेच्या सदस्यामध्ये नाराजीसोबतच आंतरिक कलह दिसून येत आहे.



राज्यात भाजप शिंदे व अजित पवारगटाची व जिल्हा परिषदेत भाजप अजित पवार गटाची सत्ता असूनही लोकप्रतिनिधी मात्र जिल्हा परिषदेतील सत्ताधारी सदस्यांच्या नियोजनाला जिल्हा नियोजन समितीमध्ये वाटाणाच्या अक्षता दाखवित असल्याचा सूर हळूहळू बाहेर येऊ लागला आहे.जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात पर्यटन व तिर्थक्षेत्र विकास,ग्रामपंचायतकरीता जनसुविधा, आरोग्य, शिक्षणाच्या अनेक योजना राबविल्या जातात.याकरीता पंचायत विभाग, शिक्षण,आरोग्य विभागाच्यावतीने कामांची यादी तयार करुन ती जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुर केल्यानंतर जिल्हा नियोजन विभागाकडे सादर केले जाते.मात्र जिल्हा नियोजन समितीमध्ये जिल्हा परिषदेचे पदसिध्द अधिकृत निवडून जाणारे सदस्यच नसल्याने लोकप्रतिनिधी त्या प्रस्तावाला बाजूला सारत आपली यादी समोर करुन नियोजन करीत असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या वर्तुळात सुरु झाली आहे.

जनसुविधेच्या ग्रामीण भागातील ५४७ ग्रामपंचायती व नागरी योजनेतील १५ ग्रामपंचायतीच्या विकासाकरीता सुमारे १८ कोटी रुपयाचे नियोजन जिल्हा नियोजन समितीने केले आहे.या जनसुविधेच्या कामाकरीता जिल्हा परीषदेच्या ५३ सदस्यांनी आपल्या मतदारसंघातील कामांची यादी जिल्हा परिषदेला सादर केली.त्या यादीला जि.प.च्या सर्वसाधारण सभेतून मंजूरीही दिल्याचे वृत्त आहे.मात्र या यादीखेरीज विशेष निमंत्रित असलेल्या सदस्यांनी आपली वेगळी यादी तसेच ३०/५४ व ५०/५४ योजनेंतर्गत माजी लोकप्रतिनिधींनी आपली यादी नियोजन विभागाकडे सादर केल्याने जिल्हा परिषदेच्या सदस्यांना वाटयाला येणाऱ्या निधीवर या लोकप्रतिनिधींनी डोळा घातल्याचे बोलले जात आहे.

जि.प.मध्ये पदाधिकारी सत्तेवर येऊन दीडवर्षाचा काळ लोटत असून या काळात लाभलेल्या पहिल्या पालकमंत्र्याने सुध्दा जिल्हा परिषदेतील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याने भाजपच्या जि.प.सदस्यामध्येच अंतरकलह बघावायस मिळत आहे.त्यातच आत्ता अजित पवारगटाकडे पालकमंत्रीपद गेल्याने हे पालकमंत्री तरी आपल्या पहिल्याच डीपीडीच्या बैठकीत जि.प.सदस्यांच्या निवडीचे आदेश देतात की गप्प बसतात याकडे लक्ष लागले आहे.डीपीडीसीवर जि.पसदस्यांना पालकमंत्री नेमत नसल्याने कार्यकर्त्यांना काय सांगावे या विवंचनेत जिल्हा परिषदेचे सदस्य सापडले आहेत. ३० सदस्यीय जिल्हा नियोजन समितीमध्ये ६ सदस्य हे पदसिध्द असतात यामध्ये अध्यक्ष, जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक,पोलीस अधिक्षक तर २४ सदस्य हे निवडून द्यावयाचे असून यापैकी २० सदस्य हे जिल्हा परिषदेतून निवडून द्यावयाचे आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला दीड वर्ष लोटूनही या सदस्यांच्या निवडीकरीता अद्यापही निवडणुक कार्यक्रम जाहीर झालेला नाही.तर ४ सदस्य हे नगरपरिषद क्षेत्रातून निवडून द्यावयाचे आहे.या ४ सदस्याकरीता मात्र २० सदस्यांना वेठीस धरले जात आहे.जिल्ह्यातील सर्व आमदार व खासदार हे विशेष निमंत्रित सदस्य असतात.परंतु सध्याच्या घडीला या विशेष निमंत्रित सदस्यांनीच जिल्हा नियोजन समितीवर कब्जा केल्याने जिल्हा परिषदेच्या नियोजनाला पाहिजे तो न्याय मिळतांना दिसून येत नाही.

महिलांना पन्नास टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या जिल्हा नियोजन समितीत पूर्वी आमदार,खासदार व सरकार नियुक्त अशासकीय सदस्यांचा समावेश होता.त्यातही ज्या पक्षाचे सरकार असेल,त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचीच वर्णी या समितीवर लागत असल्यामुळे राजकीय सोय म्हणूनही या समिकतीकडे पाहिले जात होते.काही वर्षापूर्वी सरकारने या धोरणात बदल करून विकासाच्या प्रश्नावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचा सहभाग घेण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार निवडणुक घेऊन जिल्हा परिषद व नगरपरिषदेतन सदस्य निवडले जाऊ लागले.या समितीत जिल्हा परिषद,व नगरपालिकेच्या सदस्यांना प्रतिनिधित्व मिळाले,त्यातही ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे.

## पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम दोन दिवस जिल्ह्याचे दौऱ्यावर



गोंदिया : राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम हे २६ व २७ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्ह्याचे दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. २६ ऑक्टोबरला सकाळी ८.४५ वाजता "राजवाडा' निवासस्थान अहेरी येथून प्राणहिता हेलिपॅड कडे मोटारीने प्रयाण. सकाळी ९ वाजता प्राणहिता हेलिपॅड येथे आगमन व हेलिकॉप्टरने देवरी जि.गोंदिया कडे प्रयाण. सकाळी १० वाजता देवरी हेलिपॅड येथे आगमन व शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी ११ ते दुपारी १२ पर्यंत ग्रामीण रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थिती. दुपारी १२ ते १ पर्यंत शासकीय विश्रामगृह देवरी येथे राखीव. दुपारी १ ते ३ पर्यंत तहसील कार्यालय देवरी येथे जनता दरबार कार्यक्रमास उपस्थित. दुपारी ३ वाजता देवरी येथून गोंदिया कडे मोटारीने प्रयाण. दुपारी ४ वाजता शासकीय विश्रामगृह गोंदिया येथे आगमन व राखीव. सायंकाळी ५ ते ६.४५ पर्यंत गोंदिया येथे राखीव.

२७ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता शासकीय विश्रामगृह गोंदिया येथून मोटारीने रावणवाडी कडे प्रयाण. सकाळी १० ते ११.३० पर्यत रावणवाडी पोलीस ठाणे येथे आगमन व रावणवाडी पोलीस ठाण्याच्या इमारतीचे उद्घाटन तसेच पोलीस दलास चारचाकी वाहनांच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थिती. सकाळी ११.३० वाजता रावणवाडी येथून जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया कडे प्रयाण. दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे आगमन व जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी ३.३० वाजता बिरसी विमानतळ गोंदिया कडे प्रयाण. दुपारी ४ वाजता बिरसी विमानतळ गोंदिया येथे आगमन व हेलिकॉप्टरने प्राणहिता हेलिपॅडकडे प्रयाण.

# वनपरिक्षेत्र अधिकारी, क्षेत्र सहाय्यकाला केले निलंबित

### अवैध सागवान वृक्षतोड प्रकरण भोवले, पुन्हा दोघांवर कारवाईची टांगती तलवार



**गोंदिया :** सडक अर्जुनी येथील वनपरिक्षेत्र अधिकारी अधिकारी सुरेश जाधव यांना अवैध वृक्षतोड प्रकरणी चौकशीनंतर निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही कारवाई नागपूर प्रादेशिकच्या वनसरंक्षक श्रीलक्ष्मी ए. यांनी १६ ऑक्टोबर रोजी केली.तर याच प्रकरणात पुन्हा दोन अधिकाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार असल्याची माहिती आहे. या कारवाईमुळे वन विभागात खळबळ उडाली आहे.विशेष म्हणजे २४ मे च्या अंकात बेरार टाईम्सने पहिल्यांदा या वृक्षतोडीसंदर्भात वृत्त प्रकाशित केले होते.त्यावेळी सदर आरएफओ यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली होती.



वनविभागाने कापली दल्लीच्या जंगलातून ५४ सागाची झाडे, होतेय चौकशीची मागणी

ग्रामस्थ करतायेत चौकशीची मागणी,आरएफओवर ग्रामस्थांचा रोष

गोंदियाः- स्वतःच्या शेतातील धुऱ्यावरचे सागाचे एक झाड तोडायचे असले तरी शेतकऱ्यांना वनविभागाचे उंबरठे झिजवावे लागतात. मात्र आपल्या हातून झालेली चूक लपवण्यासाठी जेव्हा खुद्द वन विभागच कामाला लागते तेव्हा कोण कुणाला काय म्हणणार असा प्रकार जिल्ह्यातील सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रधिकारी कार्यालयातंर्गत येत असलेल्या रेंगेपार दल्ली येथील जंगलपरिसरात घडले आहे. चांगल्या व सुस्थितीत असलेल्या सुमारे ५४ सागाची झाडे जानेवारी ते फेबुवारी महिन्यात कापण्यात आली असून या झाडापासून कुठलाही धोका नव्हता असे ग्रामस्थ सांगत आहेत. २०२० मध्ये जी झाडे वादळी वाऱ्यामुळे कोलमडली होती, ती आधीच वनविभागाने नेलेली होती,मात्र आता जी झाडे आत्ता कापली ती एकदम चांगली होती असेही ग्रामस्थांचे म्हणने आहे.

प्रत्यक्ष त्या जंगलातील कापलेल्या झांडाची पाहणी केल्यावरही त्या साग झाड्याच्या बुंध्यापासून लक्षात येते की सदर झाड किती चांगले राहिले असेल परंतु वनविभागाचे अधिकारी वादळ वाऱ्यामुळे झाडे पडण्याचा धोका होता, तर काही झाडे वाळायला लागली होती असे विविध कारणे आणि दर २० वर्षांनी झाडे कापावी लागतात असे कारण पुढे करुन ५४ साग झाडे कापल्याचे प्रकरणाला शासकीय लवाजमा घालण्यात यशस्वी झाल्याचे दिसून आले. मात्र ग्रामस्थ आणि काही नागरिकांच्या मते ही कापलेली झाडे अवैधरित्या कापली गेल्याचे म्हणने आहे.

विशेष म्हणजे सदर झाडांना फेबुवारी महिन्यात कापण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणाचा तपास मिळालेल्या माहितीनुसार वनविभागाचे फिरते पथक करीत असल्याची माहितीही आहे. कुणी स्वतःहून झाड तोडलेच तर वन अधिनियमानुसार तो गुन्हा ठरतो. त्यातच सर्वोच्च न्यायालय आणि वनविभागाच्या कायद्यानुसार आता जंगलातील झाडे तोडण्यावर बंदी आहे. ती झाडे त्याचठिकाणी पडून कुजतील परंतु त्यांना कापायचे नाही, आणि उचलायचे नाही असे असतांना व नवेगाव नागझिरा अभयारण्याच्या क्षेत्रात हा भाग येत असल्याने झाड कापण्याचा प्रश्नच उदभवत नसल्याचे अनेकांचे मत आहे.

यासंदर्भात सडक अर्जुनी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी सुरेश जाधव यांना विचारणा केल्यावर माझ्याकडे वेळ नाही, मी वेगळ्या कामात आहे माहीत देऊ शकत नाही असे सांगत सदर प्रकरणात माहिती देण्यास टाळाटाळ केली. तर दुसरीकडे गोंदिया उपवनसंरक्षक कार्यालयातील सहाय्यक वनसंरक्षकांना याबाबत विचारणा केल्यावर आपण सदर जागेची पाहणी केल्याशिवाय काहीही सांगू शकणार नसल्याचे बेरार टाईम्सला सांगितले.

प्राप्त माहितीनुसार सात आठ महिन्यापुर्वी सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रातील शेंडा क्षेत्रातील वन कक्ष क्रमांक ६७६ (संरक्षित वन) १७२ (राखीव वन) ६८८, ७०३, ६८१ व ६७१( संरक्षित वन ) मध्ये टप्प्याटप्प्याने एकूण ४५ वृक्षाची अवैध वृक्षतोड करण्यात आली होती. या वृक्षांची किमत ४ लाख ८ हजार २०० रुपये आहे. तर यापैकी १६ नग म्हणजे ५४ हजार ६९१ रुपयांचे लाकूड वन परिक्षेत्र अधिकारी जाधव यांनी जप्त केले होते. पण या प्रकरणात वृक्षतोड करणाऱ्या अभय देत व एकूण वृक्षतोड केलेला पुर्ण लाकूडफाटा जप्त केला नाही. परिणामी शासनाचे ३ लाख ५३ हजार ५३४ रुपयांचे नुकसान झाले.

दरम्यान याप्रकरणाची काही गावकऱ्यांनी तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने वनविभागाने चौकशी केली. चौकशीत स्पष्ट झाल्याने उपवनसंरक्षक जयराम गौडा आर यांनी शुक्रवारी (दि.२०) सडक अर्जुनीचे वन परिक्षेत्र अधिकारी सुरेश जाधव यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. आदेश अंमलात असेल तेवढ्या कालावधीत सुरेश जाधव यांना मुख्यालय उपवनसंरक्षक गोंदिया येथे कार्यरत रहावे लागणार आहे. तर सडक अर्जुनी येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचा अतिरिक्त कारभार डोंगरगाव आगाराचे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन ठाकरे यांच्याकडे सोपविण्याचे आदेश दिले आहे.

**अवैध वृक्षतोडीला दुजोरा**

सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रात मागील काही महिन्यांपासून जंगलातील अवैध सागवान वृक्षतोड प्रकरणाची चर्चा सुरू होती. याची काही गावकऱ्यांनी वन विभागाकडे तक्रार सुध्दा केली होती. त्याच अनुषंगाने वन विभागाने या प्रकरणाची चौकशी केली. त्यात अवैध वृक्षतोड झाल्याचे सिध्द झाल्याने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. तर याच प्रकरणात सहभागी असणारया पुन्हा दोन अधिकाऱ्यांवर सुध्दा निलंबनाची टांगती तलवार आहे. त्यामुळे या कारवाईकडे सडक अर्जुनी तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
आज़ादी का अमृत महोत्सव



**स्वच्छ सर्वेक्षण २०२३**

सर्व साधारण माहिती करिता जाहीर सुचना प्रसिद्ध करण्यात येते की स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघवी करणे, शौच करणे वर दंडात्मक कार्यवाही नगर परिषद प्रशासन करू शकते. तरी आपले परिसर, सार्वजनिक ठिकाण स्वच्छ ठेवावे अन्यथा खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| क्र. | विवरण | दंड |
|---|---|---|
| १. | रस्ते/मार्गावर घाण करणे | १८०/- |
| २. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | १५०/- |
| ३. | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे | २००/- |
| ४. | उघड्यावर शौच करणे | ५००/- |

**श्री. करणकुमार चव्हाण**
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद, गोंदिया

## संपादकीय

### बिहारची जातीय जनगणना राजकीय बदल घडवू शकेल काय?

भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. सर्वसाधारणपणे जनगणना सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक आधारावर घेतली जाते. जनगणना ही एक सामान्य आणि सतत चालणारी प्रक्रिया आहे. बिहार सरकारने जात जनगणना करण्याची घोषणा केल्यानंतर आलेल्या अनेक अडथळ्यानंतर प्रत्यक्ष जनगणना केली. त्यानंतर सरकारने २ ऑक्टोबर २०२३ रोजी जात-आधारित जनगणनेचा अहवाल प्रसिद्ध करून जाती-आधारित आकडे जारी केले. बिहार सरकारच्या या कृत्यामुळे आता केंद्रावरही जातीय जनगणना करण्याचा दबाव वाढू लागला आहे, मात्र केंद्र सरकार त्यास कोणत्याही प्रकारे अनुकूल दिसत नाही. म्हणजेच १९३१ च्या जनगणनेच्या आधारेच देशातील जातीआधारित लोकसंख्येचे प्रमाण पकडून जनतेच्या विकासाच्या योजनांचे नियोजन करावे लागणार आहे.

आपल्या देशात अनेक जाती आणि त्यांच्या पोटजाती आहेत, त्यांची संख्या किती आहे, कोणत्या जातीमध्ये किती लोक आहेत, त्यांची आर्थिक स्थिती काय आहे, हे सध्या निश्चित नाही. त्यासाठीच मोठ्या दबावातून मार्च २०११ मध्ये काँग्रेस सरकारकडून सामाजिक, आर्थिक आणि जाती जनगणना करण्यात आली. परंतु सरकार बदलल्यानंतर मोदी सरकारने जातीची आकडेवारी जाहीर करणे योग्य मानले नाही. परंतु ज्या ठिकाणी विरोधी पक्षाची राज्ये आहेत ते बहुजन वर्गाची जातवार संख्या निश्चित करण्यासाठी केंद्रावर दबाव आणतात, हा राजकीय पक्षाचा त्यांच्या राजनीतीच्या मदतीचा मुद्दा असला तरी सर्व पक्षासाठी तो टाळण्यासारखा निश्चितच नाही. काही पक्ष राजकारणासाठी जसे जातीचे मुद्दे घेतात तसेच काही पक्ष आपल्या राजकीय फायद्यासाठी धर्म व धर्मांधतेचे मुद्दे चघळत असतात. परंतु हे सारे बाजूला ठेवून सर्व जातींच्या उत्थानासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रत्येक जातीच्या कुवतीचे वा त्यांच्या सद्यस्थितीचे शास्त्रीय आकडे अखिल भारतीय स्तरावर समोर येणे आवश्यक आहे.

अलीकडेच, नितीश कुमारच्या राज्य सरकारने जात सर्वेक्षण, २०२३ चे निष्कर्ष जाहीर केले. ज्यामध्ये असे दिसून येते की इतर मागासवर्गीय (OBC) आणि अत्यंत मागासवर्गीय (EBCs) यांची एकूण लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ६३ टक्के आहे. एकूण आकड्यानुसार राज्यात अत्यंत मागासवगीयांची लोकसंख्या ३६.०१ टक्के, मागासवर्गीय ओबीसी लोकसंख्या २७.१२ टक्के, अनुसूचित जाती १९.६५ टक्के, अनुसूचित जमातीची लोकसंख्या १.६८ टक्के, तर जनरल जाती म्हणजेच उच्च वर्गाची लोकसंख्या ११ टक्के आहे. जात जनगणना सर्वेक्षणात एकूण १३,०७,२५,३१० लोकांनी सहभाग नोंदविला.

अहवालातील जातीनिहाय आकडे पाहिल्यास एकूण २१५ जातींची गणना झाली. बिहारच्या लोकसंख्येतील वाट्यानुसार ओबीसी समुदायामध्ये यादव - १४.२६ टक्के, कुशवाह (कोरी) - ४.२१ टक्के, कुर्मी (२.८८ टक्के), बनिया (२.३२ टक्के), अनुसूचित जाती मध्ये मोची, चमार, रविदास - ५.२६ टक्के, दुसाध, धारी, धरी- ५.३१ टक्के, मुसहर (३.०९ टक्के), पासी (०.९८ टक्के), अति मागासवर्गीय जातीपैकी तेली (२.८१ टक्के), मल्लाह (२.६१ टक्के), कानु (२.२१ टक्के), नोनिया (१.९१ टक्के), चंद्रवंशी (१.६५ टक्के), नाई (१.५९ टक्के), सुतार (१.४५ टक्के), प्रजापती (१.४० टक्के), धुनिया (१.४३ टक्के), पान, सावसी, पणार (१.७० टक्के), आणि कुंजरा (१.४० टक्के). मोमीन (३.५५ टक्के), शेख (३.८२ टक्के), सुरजापुरी मुस्लिम (१.८७ टक्के) तर उच्चवर्णीयांमध्ये ब्राह्मण (३.६६ टक्के), राजपूत (३.४५ टक्के), भूमिहार (२.८७ टक्के), आणि कायस्थ (०.६० टक्के) आहेत. हे जातीनिहाय आकडे म्हणजेच बिहारच्या एकूण जनतेचे सांख्यिकी बलाबल आहे.

अहवालाच्या रिपोर्ट नुसार, बिहारमधील धर्मनिहाय लोकसंख्येनुसार हिंदूची संख्या ८२ टक्के, मुस्लीम लोकसंख्या १७.७० टक्के, ख्रिश्चन ०.०५ टक्के, शीख ०.०१ टक्के, बौद्ध ०.०८ टक्के, ०.००९ टक्के जैन, ०.१२ टक्के इतर धर्म आणि ०.००१६ टक्के लोक कोणताही धर्म न मानणारे आहेत.

**बिहारच्या जाती सर्वेक्षणाचे आकडे काय सांगतात.**

जातीनिहाय आकड्यांच्या निष्कर्षांमुळे राज्य आणि राष्ट्रीय निवडणुकामध्ये जातींच्या सहभागाचा व त्यांच्या सांख्यिकीय प्रतिनिधित्वाचा मुद्दा ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. त्याबरोबरच सामाजिक समानता व आर्थिक बरोबरी साधण्यासाठी विविध कल्याणकारी योजनांचे कार्यवहन जातीय लोकसंख्येनुसार होण्यासाठी दबाव वाढू शकण्याची शक्यता आहे. परंतु यासाठी केवळ जातीचे आकडे पुरेसे नसून सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. सर्वेक्षणानुसार मागासवर्गीय (ओबीसी) आणि अति मागास (ईबीसी) यांची एकूण लोकसंख्या ६३ टक्के असल्यामुळे त्यांच्या कोट्याचे प्रमाण २७ टक्क्याहून अधिक करण्याची मागणी होईल. तर सरकारी नोकऱ्यांसाठी आरक्षणाची पन्नास टक्क्याची मर्यादा तोडण्यासाठी राजकीय दृष्ट्या दबाव वाढून इंद्रा साहनी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (१९९२) मधील ऐतिहासिक निर्णयामधील वाद पुन्हा सर्वोच्च न्यायालयात येईल. खरे तर जाती प्रमाणाच्या आरक्षणामुळे संविधानाच्या मसुदा कर्त्यांनी नमूद केलेली सामाजिक-आर्थिक बरोबरीची उद्दिष्टे साध्य करण्यात मदत होईल. तसेच दीर्घकालीन आर्थिक समानता आणि सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देण्यासाठी लक्ष्यित उपाययोजना विकसित करण्यासाठी जात जनगणनेचा योग्य वापर केला जाऊ शकतो.

**बिहारच्या जातीय जनगणनेचा केंद्र सरकारवर कितपत प्रभाव पडू शकेल**

जातीय आकडे जाहीर तर झाले, परंतु त्यापुढची पायरी म्हणजे तिची अंमलबजावणी होय. नितीश सरकार पुढच्या काळात कोणत्या योजना जाहीर करतील यावर बरेच काही अवलंबून असेल. आता तर राहुल गांधी यांनी काँग्रेस सत्तेत असलेल्या प्रत्येक राज्यात जातीनिहाय जनगणना सर्वेक्षण घेण्याचे आश्वासन दिले आहे. तर दुसरीकडे प्रधानमंत्री मोदीनी विरोधात सूर लावलेला आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षाला ओबीसीच्या जातीय जनगणनेचा मुद्दा गौण वाटतो. वास्तविकता: बिहारच्या ओबीसी व ईबीसींची ६३ टक्के लोकसंख्या हिच देशातील मागासवर्गीयांची एकूण लोकसंख्या ठरते. एवढ्या लोकसंख्येला दुर्लक्षित करणे कोणत्याही पक्षाला परवडणारे नाही. परंतु भाजपासाठी मागास जातीसंख्या महत्वाची नसून निवडणुका जिंकण्याकरिता आस्था, धार्मिक ध्रुवीकरण, हिंदुत्व व मंदिर हेच मुद्दे महत्वाचे आहेत. याच मुद्द्यावर २०२४ च्या लोकसभा निवडणुका जिंकू, हा त्यांचा आशावाद हिंदू बहुसंख्यांक धर्मवादावर अवलंबून आहे.

हिंदुतील असंख्य जातींनी बनलेला बहुजनवाद हा प्रोग्रेसिव विचारांच्या लोकांपर्यंत येवून पोहोचतो. मा.कांशीराम यांनी बहुजनवादाला चालना देवून तो हिंदुतील बहुसंख्यांक जात वादाशी जोडला होता. त्यामुळे हिंदुतील बहुसंख्य जाती ह्या वंचित घटक म्हणून राजकीय व सामाजिक दृष्ट्या उच्चवर्गीया विरोधात एकवटल्या होत्या. परंतु आता लालू प्रसाद यादव वगळता तशा राजकीय नेत्यांची फळी नसल्यामुळे प्रोग्रेसिव्ह लोकांची लोकसंख्या मर्यादित होवून ती निवडणुकात प्रभावहीन दिसते. एकीकडे बहुजनवादी व प्रोग्रेसिव्ह चळवळी क्षीण झाल्या, तर दुसरीकडे हिंदू बहुसंख्यांक जातीतील नेते सवर्णाच्या पक्षाचे व त्यांच्या विचारधारांचे शिलेदार बनले आहेत. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे ओबीसीचा सर्वात मोठा नेता म्हणवणारी व्यक्तीच ओबीसीच्या जातीय जनगणने विरोधी असून इतर ओबीसी नेते चकार शब्दही काढताना दिसत नाहीत.

त्यामुळे बिहार सरकारच्या जातीय सर्वेक्षणाचे आकडे जाहीर झाले असले तरी ते केवळ कागदी घोडेच ठरणार आहेत. त्याचा केंद्र सरकारच्या नीतीवर आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकावर प्रभाव पाडू शकणार नाहीत. कारण प्रभाव पाडू शकणारे घटकच (नेते, मोर्चे व रस्त्यावरचा जमाव) लुप्त झाले आहेत. त्यामुळे ८५ टक्के लोकांचा हिस्सा ११ टक्के लोकांनी वाटून घेतला तरी, एक मोर्चाही न काढता लागू झालेले ईडब्लूएस (आर्थिक) आरक्षण, महागाई आणि झपाट्याने होत असलेले खाजगीकरण यानेही बहुसंख्याकांना काहीही फरक पडत नाही. लोकांना सामाजिक व आर्थिक विकासाच्या अधिकारापेक्षा धर्मांधता, हिंदुत्व, आस्था, सत्संगातील प्रवचने व मुस्लीमद्वेष अधिक प्रिय वाटू लागला आहे. त्यामुळे जातीय जनगणनेचा मुद्दा ओबीसीसाठीच गौण ठरू शकतो. म्हणून २०१४ नंतरच्या राजकीय क्रांतीने २०२३ पर्यंत केवळ शासन रचनेच्या सर्व क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, पर्यावरण, मिडिया व आर्थिक क्षेत्रात सुध्दा मोठे फेरबदल घडवून आणले आहेत. त्यामुळे आतापर्यंत सर्व क्षेत्रात झालेले हे कॉन्क्रेटी सिमेंटीकरण म्हणजेच भारतीय जनता पक्ष व संघाच्या सत्तेची दीर्घकाळाची नांदी तर नव्हे ना! असे कोणाला वाटू लागल्यास नवल वाटून घेवू नये.

**लेखक: बापू राऊत**
**नवी मुंबई**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# ओबीसींचे अधिकार नाकारणारे




जातीनिहाय जनगणनेचा आग्रह देशभरातील ओबीसी करत आहे. मा. नितीशकुमार या ओबीसी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वातील बिहार सरकारने जातजनगणना करुन ओबीसींचे जातीच्या आधारावर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक बाजूने झालेले शोषण उघड केले. त्यात ओबीसींची लोकसंख्या ६३ टक्के असल्याचे आढळून आले. ६३ टक्के लोकसंख्या असलेल्या कष्टकरी समूहाला शासन प्रशासनातून बेदखल केल्याचे सत्य समोर आले. बिहारची ओबीसी आकडेवारी आणि त्यांचे शासन, प्रशासनातील स्थान यातील प्रचंड विसंगती स्पष्ट झाली. नुकतीच राहुल गांधींनी, देशाचे बजेट मांडणाऱ्या ९० टॉप अधिकाऱ्यांपैकी फक्त तीन अधिकारी ओबीसी असल्याचे पत्रकार परिषदेत जाहीर केले. ते ओबीसी अधिकारी फक्त ५ टक्के बजेट कंट्रोल करीत असल्याचे मांडले. त्यामुळे ओबीसी हिताचे निर्णय होत नाही. ओबीसींची संख्या शोधणे आणि त्याच्याकडे किती टक्के आर्थिक सत्ता, प्रशासकीय सत्ता, शासन सत्ता, मिडियातील सत्ता, कारखान्यातील सत्ता, न्यायालय, शिक्षण इत्यादी सत्तेतील ओबीसींचं प्रमाण शोधण्यासाठी सर्वंकष जनगणना करून ओबीसी किती प्रमाणात मागे पडला आहे याच निदान करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

आजार दुरुस्त करण्यासाठी एक्सरे करणे गरजेचे असते. त्याशिवाय आजाराचे निदान करता येत नाही. त्याची गंभीरता लक्षात येत नाही. ओबीसी जनगणना म्हणजे एक्सरे आहे. त्यावरुन ओबीसींचा आजार किती प्रमाणात आहे, हे स्पष्ट होईल, आणि त्याप्रमाणे इलाज करता येईल. हा सामाजिक न्यायाचा, समतेचा मुद्दा आहे. लोकसंख्या प्रमाणात सर्व जातींना अधिकार आणि सत्ता मिळाल्याशिवाय समता प्रस्थापित होऊ शकणार नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे मांडले. लोकांच्या समस्या मांडणारे ओबीसी पत्रकार किती आहेत? असा प्रश्न उपस्थित पत्रकारांना विचारला असता एकही पत्रकार ओबीसी नसल्याचे दिसले. ओबीसीची स्थिती या महत्त्वाच्या क्षेत्रात अशी असेल तर ही गंभीर बाब आहे.

ओबीसी पत्रकार नसेल तर ओबीसींचे प्रश्न समजून घेतले जाईल का? हा खरा प्रश्न असल्याचे त्यांनी मांडले. ओबीसींच्या सर्व क्षेत्रातील गंभीरतेचा एक्सरे म्हणून जातवार जनगणना आहे. राहुल गांधींनी ही भूमिका समजून घेतल्याने ओबीसींचे प्रश्न मोठ्या प्रमाणात चर्चिल्या जाण्याची स्थिती निर्माण झाली. आतापर्यंत प्रादेशिक पक्ष आणि सामाजिक संघटना ओबीसी आरक्षण आणि जातवार जनगणनेचा मुद्दा लावून धरत होते, परंतु मिडियामधून त्या चर्चेला स्थान दिले जात नव्हते.

मीडियामध्ये ओबीसी विरोधी लोकांचा भरणा असल्याने ओबीसी प्रश्नांची चर्चा दाबली जात असल्याचे आता स्पष्ट झाले. महात्मा फुले, चोहीकडे भटशाही, कुणब्याची दाद नाही असे का म्हणायचे? हे आता अधिक स्पष्ट होऊ लागले. देशाची ६३ टक्के तिजोरी भरणाऱ्या शेतकरी, कष्टकरी ओबीसी समाजाची मुले अधिकारी कर्मचारी नसल्यामुळे ओबीसी हितासाठी ६३ टक्के रक्कम वापरली जात नाही. ओबीसी अधिकारी कमी आणि तेही दडपणात असल्याने, ओबीसींना मागे लोटणाऱ्या उपक्रमात अधिक पैसे खर्च केले जातात. ज्या मंदिराच्या उत्पन्नाने केवळ ब्राह्मण हित साधले जाते आणि ओबीसींना केवळ लुटले जाते, त्या मंदिरांना सरकारी तिजोरीतून मोठी रक्कम पुरविली जात आहे. याउलट ग्रामीण भागातील शाळांसाठी, शेती विकासाच्या योजनांसाठी सरकारी तिजोरीतील पैसे वापरतांना थयथयाट केला जातो. कष्टकरी शेतकऱ्यांना साले, फुकटखाऊ म्हणणारे, कोणत्या बांध्या खोदून करोडपती झालेले आहे. बजेट मधील ८५ टक्के रक्कम ही ओबीसी, दलित, आदिवासी तसेच धार्मिक अल्पसंख्याक इत्यादी ८५ टक्के शेतकरी कष्टकरी बहुजन समाजाच्या कष्टातून जमा झालेली आहे. जातवार सामाजिक, आर्थिक जनगणनेतून कोणत्या जातीकडे, किती संपत्ती आहे? आणि त्यांचा कष्टाशी किती संबंध आहे? हेही स्पष्ट होणार आहे. म्हणून जातिनिहाय जनगणनेसाठी ओबीसींच्या संघटना रान उठवत आहे. नेत्यांना ते मुद्दे पुढे रेटण्यास बाध्य करत आहेत. बेरोजगार युवकांना नोकऱ्या नाही. त्यांना नोकऱ्या देण्याऐवजी दलाल एजन्सीजना युवकांचे शोषणाचे कंत्राट देणारे निर्णय घ्यायचे, कमी पगारात नोकरी करण्यास बाध्य करायचे आणि युवकांचा शक्तीपात करायचा, हे शोषणाचे आधुनिक स्वरूप आहे.

शोषणाचे हे स्वरूप वरवर जाती निरपेक्ष वाटेल परंतु जातीनिहाय जनगणनेतून ते बहुजन जातींना शक्तीहिन करण्याच्या दिशेने कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे. ओबीसींनी लोकसंख्या प्रमाणात आरक्षण असले पाहिजे या मांडणीला जातीवादी म्हणणारे जवळपास ७५ टक्के उच्च पदावर ब्राह्मण असणे, मंदिरात ब्राह्मण एकाधिकारशाही असणे, मीडियात ब्राह्मण प्राबल्य असणे याला मात्र जातीवाद म्हणत नाही. ओबीसी नेते सत्तेत आले की जंगली लोकांचे राज्य आले म्हणणारे जातीवादी नाही. स्वतःच्या आईचा खून करणाऱ्या परशुरामाला, बळीराजाला कपटाने मारणाऱ्या वामनाला महान पूर्वज म्हणणारे जातीवादी नाही. समन्यायी बळीराजाची आठवण करून, तथागत बुद्ध, चार्वाक, संत नामदेव, संत तुकाराम, शिवाजी महाराज, महात्मा, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, पेरियार रामसामी, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी महापुरुषांच्या समतावादी विचाराची आठवण करणाऱ्या लोकांना जातीवादी म्हणायचे.

ओबीसी समाज आमच्या वाट्याच्या जागा कोणी बळकावल्या हे विचारायला लागला की, त्याची उत्तर द्यायचे नाही, हिंदूंची एकता तोडत आहे म्हणून गलबला करायचा? मनुस्मृतीचं समर्थन करणाऱ्या, वर्णभेद, जातीद्वेषाचा प्रचार करणाऱ्या ढोंगी बुवाबाबांना जातीवादी, वर्णवादी म्हणायचे नाही, मनुस्मृतीचा आणि तीच्या समर्थकांचा विरोध करणाऱ्या समतावादी संघटनांना जातीवादी म्हणायचे. किती ढोंगीपणा करणार? ओबीसींना मुस्लिम द्वेष शिकवणाऱ्या ढोंग्यांनो ओबीसींच्या वाट्याच्या नोकऱ्या मुस्लिमांनी खाल्ल्या का ब्राम्हणांनी? दलितांनी, आदीवासींनी खाल्ल्या का? तेही सांगावे. ते सांगणार आहे जातवार जनगणना. म्हणून जातवार जनगणनेला विरोध करत आहे. जातवार जनगणनेलाही मुस्लिम वगैरे विरोध करत आहे का? तेही सांगा.

ओबीसीसह सर्व जातींच्या जातवार जनगणनेला मुस्लिम, दलित, आदिवासी, ख्रिश्चन इत्यादी ९० टक्के समुहातील कोणीही विरोध करताना दिसत नाही. ओबीसी हिंदू असूनही त्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या जातवार जनगणनेला विरोध करणारे कोणते हिंदू आहेत. तुम्ही जर ओबीसींचं अहित केलं नसेल तर का घाबरता जातवार जनगणनेला? ओबीसींना मुर्ख बनवण्यासाठी मुस्लिमांची भिती दाखवणारे, मुस्लिमांच्या काटपिट केलेल्या भाषणाच्या क्लिप्स दाखवून ओबीसी युवकांची माथी भडकवत आहे. ८०० वर्षे मुस्लिम शासन राहूनही ओबीसी मुस्लिम झाले नाही परंतु बंधुभाव जोपासला. ८०० वर्षांत राजेशाहीच्या काळात झाले नाही ते ओबीसी आता मुस्लिम होणे शक्य नाही. परंतु वामनी धर्माची गुलामगिरी मात्र ओबीसी निश्चितच फेकण्यासाठी सज्ज होत आहे. म्हणून सर्वांनी धर्मभेद, जातीभेद नष्ट करण्यासाठी लोकसंख्या प्रमाणात प्रतिनिधित्व, सर्वांना समान संधी उपलब्ध करुन बंधुभाव वाढीसाठी प्रयत्न करावे.

**जय सत्यशोधक!**
**सत्य की जय हो!**
**ऽबाबा बीडकर**

## निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी जगावे की मरावे

**देवेंद्र रामटेके**

**गोंदिया:** मागच्या चार महिन्यापासून अनुदान न मिळाल्याने जिल्ह्यातील संजय गांधी व श्रावण बाळ निराधार योजनेतील लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.परिणामी त्यांच्यासमोर जगावे की मरावे असा प्रश्न उभा ठाकला आहे.

ऐकट्या गोंदिया तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेत ७११० तर श्रावण बाळ वृद्धपकाळ निवृत्ती योजनेतील लाभार्थ्यांची संख्या १४९३० एवढी आहे. या दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांना मागच्या चार महिन्यापासून अनुदान वाटप न झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी उद्भवली आहे.

समाजातील विधवा, निराधार, परित्यकता महिला, दुर्धर आजार ग्रस्त, अपंग तसेच पासस्ट वर्षावरील गरीब गरजू व्यक्तींना त्यांचे योग्य प्रकारे संगोपन व उपजीविका व्हावी म्हणुन संजय गांधी व श्रावण बाळ योजनेतून एका ठराविक रकमेच्या स्वरुपात त्यांना आर्थिक मदत अनुदान म्हणुन देण्यात येतो. परंतू मागच्या जुलै महिन्यापासून या गरीब व गरजू लाभार्थ्यांना अनुदानच वाटप झाले नाही. हिच परिस्थीती संपूर्ण जिल्हाची आहे. या योजनेतील लाभार्थी हे अत्यंत गरीब व आर्थिक परिस्थिती खालावलेली असतात त्यामूळे त्यांची उपजीविका पूर्ववत सुरु राहण्यासाठी त्यांना वेळेवर अनुदानाची गरज असते परंतु मागच्या चार महिन्या पासून त्यांना अनुदान न मिळाल्याने त्यांच्या पुढे उपासमारीचा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. सध्या सणासुदीचा काळ सुरू आहे अशा काळात ही गरिबांना अनुदान वेळेवर मिळत नसल्याने या लाभार्थ्यांनी आपली व्यथा कुणापुढे मांडावी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**दिवाळी होणार अंधारात?**

येणाऱ्या काही दिवसात दिवाळी हा सण येत आहे अशातच दिवाळीतही अनुदान मिळणार की नाही यात शंका उत्पन्न होत आहे. त्यामूळे या गरिबांची दिवाळी अंधारात तर होणार नाहीं ना असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे.

अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. अनुदान प्राप्त होताच वाटप करण्यात येईल.-

**सिमा पाटणे** नायब तहसीलदार गोंदिया.

## मोहगाव बूज येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन



**तिरोडा:-** तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्रांतर्गत मोहगाव बूज.ते तुमखेडा खु.रस्ता रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झालेली असून सदर रस्ता जिल्ह्याला जोडणारा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रहदारी होत होती व परिणामी नागरिकांना दळणवळणाकरिता फार मोठा त्रास सहन करावा लागे याची दखल घेत तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी ग्रामविकास निधी अंतर्गत १.०० कोटी रुपये मंजूर करून सदर कामांचे भूमिपूजन आमदार हस्ते संपन्न झाले. सोबतच सिमेंट रस्ता (खोलगल्ली) २० लक्ष रुपये , कटंगी जलाशयाचा पाणीपुरवठा मोहगांव बु., हिरडामाली, तुमखेडा ह्न धुंदाटोला, सर्वाटोला, पाणीपुरवठा योजना ३ कोटी रुपये ह्न प्रभाग संघभवन १२ लक्ष रुपये, वंदनिय तुकडोजी महाराज चौक सौंदयीकरण ५ लक्ष रुपये, प्राथमिक शाळा मोहगांव शौचालय बांधकाम ६ लक्ष रुपये, वंदनिय तुकडोजी महाराज चौक सभामंडप ५ लक्ष रुपये, बोरीटोला ते मोहगांव बु. सिमेंट रस्ता १० लक्ष रुपये , सभामंडप बांधकाम सर्वाटोला ५ लक्ष रुपये ह्न सभामंडप बांधकाम धुंदाटोला ५ लक्ष रुपये, वंदनिय तुकडोजी महाराज चौक सोलार लाईट १ लक्ष रुपये, वर्गखोली दुरुस्ती प्राथमिक शाळा मोहगांव बु. ७ लक्ष रुपये आदी विकासकामे समाविष्ट आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटक पंकज रहांगडाले अध्यक्ष जि. प. गोंदिया, खोमेश्वर रहांगडाले माजी आमदार, गिरधारी बघेले स्भापती कृउबास गोरेगाव,मनोज बोपचे सभापती पं. स. गोरेगांव, सिताबाई रहांगडाले माजी जि. प. सदस्य, किशोर पारधी, सदस्य पं. स. गोरेगांव कमलेश रहांगडाले, उपसरपंच मोहगांव बु., गणराज पटले अध्यक्ष तं.मु.स.मोहगांव, ओमप्रकाश कटरे सदस्य पं. स. गोरेगांव, संजय बारेवार, राणी रहांगडाले, ज्योतीका कुंभरे, सरपंच रंजुकुमार येडे,थानसिंग रहांगडाले, महेश चौधरी, हुमराज बावनकर, शिला राऊत, मनोहर गौतम, दसाराम साऊसकर, दुर्योधन पटले, बु. व समस्त ग्रामवासी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाले आहे.

## असत्यावर सत्याच्या विजयाचा प्रतिक आहे दसरा-प्रफुल पटेल



**गोंदिया:** दसरा सण मोठया उत्साहाने साजरी करण्याची परंपरा आहे. असत्यावर सत्याच्या विजय प्राप्त करणारा हा मोठा दिवस आहे. वैरावर प्रेमाने व शत्रूवर पराक्रमाने विजय प्राप्त करणारा हा दिवस विजया दशमी म्हणून साजरा केला जातो असे प्रतिपादन श्री प्रफुल पटेल यांनी केले

या कार्यक्रमाचे उद्घाटक खासदार प्रफुल पटेल प्रमुख अतिथि माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते वीर सैनिक, शासकीय कर्मचारी व रेल्वे कर्मचारी का सत्कार यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. दसहरा उत्सव समितीचे संयोजक नानू मुदलियार यांनी सिव्हील लाईन्स परिसरातील नूतन विद्यालयात आयोजित रावणदहनाच्या कार्यक्रमाची सलग २० वर्षाची परंपरा कायम ठेवली आहे.

खा. प्रफुल पटेलांनी दसऱ्याच्या सर्व जनतेला शुभेच्छा देत पुढे म्हणाले की, नवरात्र उत्सवात जगत जननी देवीची पूजा मोठ्या आस्थेने करण्यात आली. नवरात्रीनंतर दहाव्या दिवसाला विजयादशमी म्हटले जाते. त्यातच विजया दशमी निमित्त असत्या चे प्रतीक म्हणून रावणाच्या प्रतिकृतीच्या पुतळ्याचे दहन करण्याची परंपरा वर्षांनु वर्षापासून जोपासली जात आहे. व्यक्तींनी वाईट विचारांचा त्याग करून चांगले विचार आत्मसात करून आचरणात आणणे हेच या दिवसाचे महत्त्व असे मनोगत कार्यक्रम प्रसंगी श्री प्रफुल पटेल यांनी केले.

यावेळी खा.प्रफुल पटेल यांच्या सोबत माजी आमदार राजेंद्र जैन, संयोजक नानू मुदलियार, देवेंद्रनाथ चौबे, सौ. सविता मुदलियार, राधेश्याम मेंढे, पियूष मुदलीयार, रोहित मुदलियार, राजा देशमुख, सोनू लाडे, कमलेश नशिने, अनिल यल्लुर, स्वप्निल पिल्ले, किरण वर्मा, दिव्या येल्लुर, पुष्पा देशमुख, युवराज नारनवरे, महेंद्र श्रीवास्तव, चंदु मेश्राम, राजेंद्र कटकवार, जितेंद्र सिंग, व्ही. पटले, पिंटू येळे, योगेश रामटेककर, पवन परियानी, लकी शुक्ला, संदिप कोटमकर, रविंद्र रहांगडाले, मोहीत पांडे, प्रकाश आगासे, मनोहर बिसेन, मुकेश साहू, अशोक नशीने, मनोहर लाडे सहीत दशहरा उत्सव समितीचे महिला व पुरुष व हजारोच्या संख्येने शहरवासी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन निरज नागपुरे यांनी केले.

रावण दहन कार्यक्रमात श्री राम, सीता, लक्ष्मण, हनुमान की आकर्षक झाकी, मथुरा येथिल श्री राधा कृष्णा नृत्य व मोर एवं गोड़ा नृत्य व फटाक्यांची भव्य अतिषबाजी कार्यक्रमांचे आकर्षण ठरली.

## लेखापरीक्षण नामिका तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज आमंत्रित

**गोंदिया :** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमान्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण, निबंधकांनी तयार केलेल्या व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेवरील लेखापरीक्षकांकडुन करवून घेण्याची तरतुद आहे. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांच्या नामिकेसंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ ब तयार करण्यासाठी आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ६९(१)(फ) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या २०२३-२०२६ या कालावधीसाठी लेखापरीक्षक नामिका लेखापरीक्षणासाठी www.mahasahakar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर २३ ऑक्टोबर ते ०६ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्जासंदर्भात सविस्तर तपशील वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी सद्यस्थितीत सहकार खात्याच्या लेखापरीक्षक नामिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांनी तसेच नामिकेवर नव्याने येवू इच्छिणाऱ्या लेखापरीक्षकांनी उक्त निर्धारीत मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत. असे आवाहन जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी केले आहे.

अधिक माहितीकरीता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, गोंदिया तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, या कार्यालयास संपर्क करावा असेही त्यांनी सांगितले.

## शिक्षणाधिकाऱ्यांनी शेतात जाऊन घेतली माता-पालकांची भेट



**गोंदिया:** निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत १४ ते २१ ऑक्टोबर दरम्यान निपुण उत्सव साजरा केला गेला. त्या अनुषंगाने माता गटांच्या भेटीला अंतर्गत प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये, गटशिक्षणाधिकारी चौधरी, मुख्याध्यापक व शिक्षक प्रथम प्रतिनिधी प्रशांत तुरकने यांनी शेतात जाऊन माता-पालकांची भेट घेतली.

आता धान कापणीचा हंगाम सुरु असल्याने माता-पालक धान कापणीला निघून जातात. त्यांच्या कामाचा खोळंबा होऊ नये, याकरिता माता गटांना शेतात भेटून त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. माता गटातील सर्व मातांसोबत शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांचे अनुभव शेअर केले.

मागील वर्षी निपुण उत्सवादरम्यान गणखैरा गावात भेट देण्यात आली होती. वेगवेगळ्या शाळांत भेट देताना गावातील निपुण भारत अंतर्गत माता गटांचा आढावा नेहमी भेटीदरम्यान घेतला जातो. यामुळे जिल्ह्यात याचा फायदा होताना दिसून आला. जिल्हा व तालुकास्तरावर आढावा घेतल्याने मुलांसोबत मातांचा सक्रिय सहभाग दिसून आला. जिल्ह्यात एकूण सर्वच जिल्हा परिषद शाळांतून ५ हजार ३२८ माता गट तयार करण्यात आले आहेत. मुलांच्या शिक्षणात माता पालकांचा सहभाग वाढवून मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान पक्के करण्याचा निर्धार घेऊन शिक्षण विभागाकडून एक यशस्वी पाऊल उचलण्यात आले आहे.

**असा झाला बदल**

मुलांचा आता वाचनाचा सराव वाढला आहे. वाचन सुधारले आहे. मुले गणितपण चांगल्याप्रकारे करायला लागली आहेत. हे सर्व शिक्षक व आम्हीपण त्यांचा अभ्यास घेतल्यामुळे मुलांमध्ये हा सर्व बदल झाला आहे. ऑडिओ-व्हीडीओमुळे खूप काही शिकायला मिळत आहे. ऑडिओ-व्हिडीओमध्ये येणाऱ्या क्रियाकृती आम्हाला आमच्या दैनंदिन जीवनात फार उपयोगी पडतात.

## भाजप शिक्षक आघाडीचे जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन

**गोंदिया:-** जिल्ह्याची निर्मिति १ में १९९९ ला झाली असून २२ वर्षाचा काळ लोटून गेला तरीही जिल्ह्याच्या अनेक विभागात अनेक पदे अजूनही रिक्त आहेत किंवा पद निर्मिती झालेली नाही. त्यातच माध्यमिक शिक्षण विभाग, वेतन पथक (माध्य.), वेतन पथक (प्राथ.) आणि वरिष्ठ लेखा परीक्षण या कार्यालयातील मंजूर पदे भरण्यात यावे, या मागणी चे निवेदन भाजप शिक्षक आघाडी च्या शिष्टमंडळाने रोज शुक्रवारी (दि.२०) मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या मार्फत देण्यात आले.

फक्त एकमेव शिक्षण अधिकारी हे पद भरलेले आहे. इतर पदांचे कार्य हे खाजगी शाळेतील व जिल्हा परिषदेच्या उसनवार कमचाऱ्यांच्या भरवसा वर सुरु आहे. त्यामुळे उसनवार कर्मचाऱ्यांवर वचक नसल्यामुळे कासव गतीने काम सुरु आहे. याचा फटका शाळेच्या कामाने या कार्यालयात येणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर, पालक व विद्यार्थी यांना बसतो. कामे वेळेवर होत नाहीत. या गंभीर समस्ये कडे लक्ष देऊन या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावी, या मागणी चे निवेदन देतेवेळी शिष्टमंडळात राज्य कार्यकरिणीचे पदाधिकारी अरुण पारधी, लीलेश्वर बोरकर, जनता शिक्षक संघाचे लक्ष्मण आंधळे, आघाडीचे जिल्हा संयोजक चरणदास डहारे, सह संयोजक मुन्नालाल कटरे, अनिल कटरे, भेरसिंग बिसेन,



पी.सी.बोपचे, सतीश मंत्री, दिनेश कोहळे, प्रकाश बोंदरे, मनोज येले आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# खोक्याची लंका दहन करणारा धगधगता निखारा माझ्याकडे-उद्धव ठाकरे



**मुंबई:-** शिवसेनेच्या ठाकरे गटाचा दसरा मेळावा मुंबईच्या दादरमधील शिवाजी पार्कवर सुरु आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी राज्यभरातील शिवसैनिकांनी हजेरी लावली आहे. संपूर्ण राज्यभरातील नागरिकांचं लक्ष लागलेल्या ठाकरे गटाच्या मेळाव्यात शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली आहे. खोक्याची लंका दहन करणारा धगधगता निखारा माझ्याकडे आहे, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर टीकास्त्र सोडलं.

उद्धव ठाकरेंनी भाषणाच्या सुरुवातीलाच आपण जरांगे पाटलांना धन्यवाद देत असल्याचं नमूद केलं. "मी भाषणाच्या सुरुवातीला आवर्जून मनोज जरांगे पाटलांना धन्यवाद देतोय. अत्यंत समजूदारपणे त्यांनी आंदोलन चालू ठेवलंय. आज त्यांनी धनगरांनाही साद घातली आहे ही चांगली गोष्ट केली. जालन्यात हे आंदोलन शांततेत चालू होतं. जसं जालियनवालामध्ये घुसून इंग्रजांनी अत्याचार केला होता, त्याचप्रमाणे आंतरवलीमध्ये शांततेत आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांवर सरकारने पाशवी हल्ला केला होता, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी जखमी आंदोलकांना भेटायला गेले असताना दिसलेलं चित्र मेळाव्यात सांगितलं.

उद्धव ठाकरे म्हणाले, ५७ वर्षे झाली. पण आपण परंपरा थांबू दिली नाही. मोडता घालण्याचा प्रयत्न झाला, पण त्यांना मोडीत काढून परंपरा चालू ठेवली आहे. पुढची अनेक वर्षे सुरुच ठेवणार आहोत. सर्वप्रथम दसऱ्याच्या शुभेच्छा. हा मेळावा या संस्कृतीचं विराट दर्शन आहे. आपण खोकासुराचं दहन करणार आहोत. रामाने रावणाचा वध केला. रावण सुद्धा शिवभक्त होता. पण तो शिवभक्त असूनही रामाला त्याचा वध करावा लागला. कारण रावण माजला होता.

आपली शिवसेना पळवण्याचा प्रयत्न होतोय. प्रभू श्रीरामचंद्रांनी धनुष्यबाणाने रावणाचा वध केला होता. तो धनुष्यबाणही यांनी चोरला आहे. ज्याप्रमाणे हनुमानाने रावणाची सोन्याची लंका पेटवली होती. तशीच तुमची खोक्याची लंका दहन करण्यासाठी इथं शिवसैनिक जमला आहे. सध्या क्रिकेटचा मौसम आहे. वर्ल्डकप सुरू आहे. मधेमधे जाहिराती असतात. काही जाहिराती पाठ होतात. एक जाहिरात अक्षय, अजय देवगण, शाहरुख खान आमच्याकडेही तिघेही बसलेत. त्यांना कमला पसंत आहे, यांना कमळा पसंत आहे, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी शिंदे गटाला टोला लगावला.

### देशात लोकशाही राहणार की नाही?

**उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे नाव न घेता टीका केली. सर्वोच्च न्यायालयाने यांचे कानपट फोडले. तरी सकाळी उठून काही झालं नसल्यासारखं वागतात. एक लवाद जर सुप्रीम कोर्टाचे ऐकत नसेल तर देशात लोकशाही राहणार आहे की नाही, असा उद्विग्न सवाल ठाकरे यांनी केला. भारत मातेची लोकशाही टिकणार की नाही? ३० तारखेला बघू.. जनतेच्या न्यायालयात जाऊ द्या असं मी म्हणत असल्याचे ठाकरे यांनी म्हटले.**

### घराणेशाहीच्या मुद्यावर मोदींवर बोचरी टीका

**पंतप्रधान मोदी यांच्यासह भाजपकडून राजकीय घराणेशाहीवर टीका केली जात आहे. या घराणेशाहीच्या टीकेवर उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार पलटवार केला. उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, सगळीच घराणी वाईट नसतात.. तुम्हाला घराणेशाहीचा तिटकारा असेल तर तुमच्याकडे आमच्याकडून आलेल्या घराणेशाहीचे काय करणार? सद्दाम, मुसोलिनी, हिटलर यांना घराणेशाहीची पार्श्वभूमी होती का असा प्रश्न त्यांनी केला. ज्यांच्या घराण्याचा आगापिछा नसतो अशी लोक घातक असतात. जर्मनी हे त्याचे उदाहरण आहे. जर्मनीत आता हिटलरचा तिटकारा आहे. त्यालाही पाशवी बहुमत मिळाले. त्यानेदेखील अंधभक्त तयार झाले असल्याचे त्यांनी म्हटले.**

### खुर्ची डळमळीत असेल तर देश मजबूत

**उद्धव ठाकरे यांनी आघाडीच्या राजकारणाच्या बाजूने भाष्य केले. एकाच पक्षाला आता पाशवी बहुमत असणारे सरकार नको असे त्यांनी स्पष्ट म्हटले. जेव्हा खुर्ची डळमळीत असते तेव्हा देश मजबूत होतो. पी.व्ही.नरसिंहा राव, अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहन सिंह यांच्या काळात आघाड्यांचे सरकार होते. मात्र, या काळात देश मजबूत झाल्याकडे त्यांनी म्हटले. २०१४ मध्ये मोदींना वेड्यासारखा पाठिंबा दिला असल्याचे त्यांनी भाष्य केले. येत्या निवडणुकीत आपलं सरकार येणार. आपलं सरकार आणणार म्हणजे आणणारच असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.**

### भाजपला इशारा

**उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना नेते, शिवसैनिकांना मिळत असलेल्या कारवाईच्या धमक्यांवर त्यांनी भाष्य केले. ठाकरे यांनी म्हटले की, आज दमदाट्या करणाऱ्यांना सांगतो, आमच्या लोकांना विनाकारण आज त्रास दिला तर आमचं सरकार आलं तर तुम्हालाही उलट टांगू, असा इशारा त्यांनी दिला.**

### सुरतेला पळून जाणारे महाराष्ट्राचे हित काय करणार

**छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली त्याचा बदला म्हणून मुंबई, महाराष्ट्र लुटली जात असल्याचे ठाकरे यांनी म्हटले. मुंबईला दिल्लीसमोर उभं करायचं आहे. हा त्यांचा डाव आहे. हे आम्ही कधीही होऊ देणार नाही. मुंबईला दुसऱ्या मार्गाने तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. महापालिकेच्या ऐवजी आता नीती आयोग मुंबईचा विकास करणार असल्याचे त्यांनी म्हटले. एका बिल्डरला पालकमंत्री केलं आहे. त्याचं ऑफिस मुंबई महापालिकेत आहे. मुंबई बिल्डरांना देण्यासाठीचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.**

## कोषागार कार्यालयाला वेळेचा विसर

### सकाळी अकरानंतरच सुरु होते अधिकारी-कर्मचाऱ्यांची कामे



गोंदिया: सर्व शासकीय कार्यालयांची वेळ सकाळी ९.४५ अशी असताना येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत असलेल्या जिल्हा कोषागार कार्यालयात ही वेळ पाळली जात नसल्याचा प्रकार गुरुवारी (दि.१९) दिसून आला. विशेष म्हणजे सकाळी ११ वाजल्यानंतरही काही अधिकारी व कर्मचारी कार्यालयात हजरच झाले नव्हते. यावरुन या कार्यालयात अकरा वाजताच्या नंतरच कामाला सुरुवात होत असल्याचा प्रतय्य येत आहे.

शहरासह जिल्ह्यातील अनेक शासकीय आस्थापनावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी हे नियोजित वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचे चित्र पहावयास मिळते, याचा प्रत्यय गुरुवारी जिल्हा कोषागार कार्यालयात दिसून आला. सामान्य माणसाचा जिल्हा कोषागार कार्यालयाशी संपर्क नसला तरी शासकीय आस्थापनावर काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह मृतक अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांचा संबंध असतेच. या कार्यालयामार्फत सर्व शासकीय जमा, रक्कम, शासनाती जमा करण्याचे काम केले जाते. योग्य लेखाशिर्षाखाली रकमा जमा करण्याबरोबरच कर्मचाऱ्यांचे वेतन हे कोषागार कार्यालयामार्फतच केले जाते. कोषागार कार्यालयाच्या कामात सुसूत्रता व पारदर्शकता येण्यासाठी महाकोष आनलाइन प्रणाली तयार केली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्याला असणारे अग्रीम देय, ते कोषागार कार्यालयमार्फत देय होते. भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजना, रजा रोखीकरण, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचे सर्व सेवानिवृत्तीच्या रकमा, कंत्राटी सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मानधनावरील खर्च, वीज, पाणी, पेट्रोल, वंगण, मोटर दुरुस्ती खर्च, इतर सर्व आकस्मिक खर्च, सहाय्यक अनुदान, अर्थसहाय्य,वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती, वैद्यकीय अग्रीम, शिष्यवृत्ती व विद्यावेतन याच कोषागारातून दिल्या जातात या कार्यालयामार्फत अधिकारी व कर्मचाऱ्यांची वेतन देयके, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, कर्मचाऱ्यांची कौटुंबिक निवृत्ती वेतन यासह इतर कामे केली जातात.

कार्यालयीन वेळ सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ६.१५ ची असली तरी कार्यालयात कार्यरत अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या मर्जीने कार्यालयात येत असल्याचा प्रत्यय गुरुवारी आला. १०.३० ची वेळ होऊनही शिपाईसह एक-दोन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कर्मचारी व अधिकारी उपस्थित नव्हते. याच कार्यालयाची नाही तर इतरही कार्यालयांची हीच स्थिती शहरासह जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांची आहे.

# मुरदोली-कोसमतोंडी रस्ता हरविला खड्ड्यात

## बांधकाम विभागाची डोळेझाक: वाहन चालकांना करावी लागतेय कसरत



**पांढरी:** सडक अर्जुनी तालुक्यातील पांढरी जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येत असलेला व संपूर्ण परिसराला जोडणारा एकमेक मुख्य मुरदोली-कोसमतोंडी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग व शाखा अभियंत्याच्या हलगर्जीपणामुळे पूर्णपणे उखडला आहे. यात ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून वाहन चालकांना तारेवरचीक कसरत करावी लागत आहे.

मुरदोली ते कोसमतोंडी हा मार्ग पांढरी जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येत असलेल्या गावांना जोडणारा एकमेव मुख्य मार्ग आहे. परिसरातील प्रत्येक लहान-मोठी गावे या मार्गाशी जोडलेले आहेत. त्यामुळे हा मार्ग परिसरासाठी महत्वाचा आहे. मुरदोली ते कोसमतोंडी या मार्गाची लांबी १४ किलोमीटरची आहे. याचवर्षी पांढरी ते कोसमतोंडी ७ किलोमीटर रस्त्याची डागडुजी करण्यात आली. तसेच पांढरी ते मुरदोली ७ किलोमीटर रस्ता जैसे थे अर्थात खड्डेयुक्त आहे.

### अनेकांना झाली दुखापत

**मुरदोली ते पांढरी या सात किलोमीटर अंतराच्या रस्त्याची पूर्ण वाट लागली आहे. खड्डेयुक्त रस्त्याने कित्येक वाहनचालकांना दवाखान्यात पाठविले आहे. या खराब रस्त्याने प्रवास करताना अपघाताची भीती सतत मनात भेडसावत असते. अपघाताच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे.**

### सर्वाधिक वर्दळीचा मार्ग

**मुरदोली ते कोसमतोंडी हा मार्ग साकोली, भंडारा, नागपूर महामार्गाला जोडणारा या परिसरातील एकमेव मार्ग आहे. १५ किलोमीटर कमी अंतराचा पडतो. त्यामुळे गोंदिया, आमगाव,गोरेगाव, सालेकसा या तालुक्यातील प्रवासी तसेच वाहन चालकांना मुरदोली ते कोसमतोंडी हा मार्ग सोयीस्कर ठरतो. म्हणून या मार्गावर प्रवासी, दुचाकी, चारचकी वाहनचालकांची नेहमीच वर्दळ असते.**

मागील कित्येक महिन्यांपासून गोंगले ते मुरदोली या रस्त्यादरम्यान मोठ्या प्रमाणात रस्ता खराब झाला असून कधी अपघात होईल सांगता येत नाही. जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. स्थानिकांनी या बाबतीत कित्येकदा अधिकाऱ्यांना सांगून सुद्धा ते दुर्लक्ष करीत आहेत.

## शालेय पोषण आहाराची अफरातफर! वाडीत सापडली मिरची पावडरची पाकिटे



**देवरी:** तालुक्यातील ग्रामपंचायत पालांदूर/जमी. येथील वॉर्ड क्रमांक ३ मधील अंगणवाडी केंद्र क्रमांक २ येथे शालेय पोषण आहाराची अफरातफर होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अंगणवाडीच्या शेजारील वाडीत शालेय पोषण आहारातील मिरची पावडरची सुमारे आठ ते दहा किलो वजनाची पाकिटे आढळून आली आहेत.

अंगणवाडी सेविकेने हे साहित्य वाडीत लपवले असावे, असा संशय ग्रामस्थांमधून व्यक्त केला जात आहे. या अंगणवाडी केंद्रात शोभा लांजेवार या सेविका म्हणून कार्यरत आहेत. त्या शासनाकडून आहार मिळत असतानाही विद्यार्थ्यांना कमी प्रमाणात देत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. १४ आक्टोबर रोजी अंगणवाडीच्या शेजारी असलेल्या वाडीत मिरची पावडरची पाकिटे आढळून आल्यानंतर ग्रामस्थांनी लांजेवार यांना विचारपूस केली. यावेळी त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने ग्रामस्थांचा संशय बळावला.

याबाबत सरपंच आणि उपसरपंचांसह ग्रामपंचायतीच्या इतर सदस्यांना माहिती देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी दाखल होत अंगणवाडी सेविकेला जाब विचारला. मात्र, लांजेवार यांनी त्यांनाही योग्य उत्तरे दिली नाही. अखेर ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी हे साहित्य जप्त केले. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने अंगणवाडी सेविका शोभा लांजेवार यांना त्वरित निलंबित करावे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. पुढील दोन दिवसांत निर्णय न झाल्यास अंगणवाडीला कुलूप ठोकण्याचा इशाराही गावकरयांनी दिला आहे.

## धनादेश अनादर प्रकरणी तीन महिन्याचा कारावास

**गोंदिया :** येथील जिल्हा व सत्र न्यायालयात धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला तीन महिने कारावास व १ लाख ७० हजार रूपयाचा दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी एस.डी.वाघमारे यांनी १८ ऑक्टोबर रोजी हा निर्वाळा दिला. प्रमोद लक्ष्मण वालके रा.खमारी ता.तिरोडा असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

सविस्तर असे की, तिरोडा तालुक्यातील खमारी येथील प्रमोद लक्ष्मण वालके यांनी श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि.शाखा गोंदिया येथून कर्ज घेतले होते. परंतु, वेळेवर कर्जाची परतफेड केली नाही. परिणामी कर्जाचे हप्ते थकल्याने कंपनीसोबत करार करून आरोपीने कंपनीला एक लाख ३५ हजार ३६२ रुपयाचा धनादेश दिला. श्रीराम फायनान्स कंपनीच्या वतीने हा धनादेश वटविण्यासाठी बँकेत जमा करण्यात आला. मात्र आरोपीच्या खात्यात रक्कम नसल्याने तो धनादेश वटला नाही.

परिणामी फसवणूक होवून धनादेशाचा अनादर झाला. या अनुसंगाने श्रीराम फायनान्स कंपनीने न्यायालयात हे प्रकरण दाखल केले. न्यायालयाने दोन्ही पक्षाचे युक्तीवाद ऐकल्यानंतर या प्रकरणी आरोपीला दोषी धरले. १८ ऑक्टोबर रोजी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी वाघमारे यांनी धनादेश अनादर प्रकरणी आरोपी प्रमोद वालके याला तीन महिने कारावास व १ लाख ७० हजार रूपयाचा दंड अशी शिक्षा ठोठावली. श्रीराम कंपनीच्या वतीने ॲड.रुपेंद्र कटरे तर विधी अधिकारी म्हणून वोसवेल प्रफांसीस जोसेफ यांनी काम पाहिले.

## श्री सारथी संस्थेच्यावतीने कटंगी कला येथे वृक्षारोपण



**गोंदिया:-** तालुक्यातील श्री सारथी बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने ग्रामपंचायत कटंगी(कला) येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी प्रधानमंत्री लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव श्रीमती ममता रमेशकुमार राणे, सरपंच मोहीनीताई वऱ्हाडे, पंचायत समिती सदस्य विनोद बिसेन, तंटामुक्त समिती अध्यक्ष राजु वऱ्हाडे, पोलीस पाटील उमेश बावनकर, ग्रामपंचायत सदस्या श्रीमती नेवारे, संतोष दमाहे, श्रीमती ठाकरे, भूमिता बघेले, श्री.भुरे, महेंद्र नेवारे, श्रीमती फुले आदी उपस्थित होते.

# चंद्रपूर-जबलपूर गाडीला सौंदड स्थानकावर थांबा द्या!

## अशोक लंजे यांचे रेल्वे मंत्र्यांना पत्र




**गोंदिया:** गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्गावरील चंद्रपूर-जबलपूर, बिलासपूर-चेन्नई, कोरबा यशवंतपूर या रेल्वे गाड्यांना या मार्गावरील सौंदड रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात आला होता. पण कोरोना कालावधीत तो रद्द करण्यात आला. ते अद्यापही पूर्ववत न केल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कोरोना काळात या तिन्ही रेल्वे गाड्यांचा रद्द केलेला थांबा पूर्ववत करण्याची मागणी सडक अर्जुनी भाजप तालुकाध्यक्ष अशोक लंजे यांनी केंद्रीय रेलमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे व रेल्वे महाव्यवस्थापक यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

गोंदिया-बल्लारशा मार्गावरील धावणाऱ्या जबलपूर-चंद्रपूर या रेल्वे गाडीच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी या मार्गावरील सौंदड, अर्जुनी-मोरगाव, मूल या रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात यावा, सौंदड रेल्वे स्थानकावरील तिकीट आरक्षण केंद्र दिवसभर सुरु ठेवण्यात यावे, येथील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरुन त्यांच्यासाठी क्वार्टर तयार करण्यात यावे.

नागभिड रेल्वे लाइनच्या देखभाल दुरुस्तीसाठी पीटलाईन तयार करण्यात यावी, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे विभागाचे डीआरएम कार्यालय नागपुरऐवजी गोंदिया येथे स्थानांतरीत करण्यात यावे, सौंदड रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण करुन तेथे प्रवाशांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्या. लोकल गाडीचा विशेष दर्जा काढून तिकीट दरात कपात करण्यात यावी, अशी मागणी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनातून अशोक लंजे यांनी केली आहे.

## नवेगाव ग्रामपंचायतीत ५० हजारांचा अपहार

**मुंडीकोटा:** तिरोडा तालुक्यातील नवेगाव खुर्द येथील सात सदस्यांनी सरपंच व ग्रामसेवकावर ५० हजार रूपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला. त्याची तक्रार त्यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे केली आहे.

नवेगाव खुर्द येथील हनुमान मंदिराजवळ सौर उर्जा पाणी टाकीच्या दुरुस्ती कामासाठी ५० हजार रुपये पंचायत समितीस्तरावरुन पंधरा वित्त आयोगातून मंजूर करण्यात आले होते. परंतु सदर काम न करता संपूर्ण बिलाची रक्कम उचल करण्यात आली असल्याचा आरोग ग्राम पंचायतीच्या सात सदस्यांनी केली आहे.

सरपंच व ग्रामसेवकांच्या संगणमताने पैशांची अफरातफर केली असल्याने कामाचे बिल आणि संपूर्ण दस्ताऐवजांची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागितली असता ग्रामसेवक टेंभरे यांनी कोणताही प्रतिसाद न देता बिल किंवा इतर दस्ताऐवज दिले नाही. त्यामुळे खंडविकास अधिकाऱ्यांना तक्रार करुन अपील करण्यात आली. त्या अपिलामध्ये ग्रामसेवकावर कामात कसूर असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. तसे त्यांना नोटीशीद्वारे कळविण्यात आले.

खंडविकास अधिकाऱ्यांनी १२ सप्टेंबरला अपील निकाली काढण्याचे पत्र दिले. त्यामुळे काम न करता सरपंच व ग्रामसेवकांच्या संगनमताने काम न करताच रकमेची उचल केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे दोशींची चौकशी करुन त्यांना बडतर्फ करण्यात यावे, असे सातही सदस्यांनी आपल्या तक्रार अर्जात नमूच केले आहे. तने न झाल्यास ग्रामपंचायतसमोर आमरण उपोषणाचा इशारासुद्धा सातही ग्रामपंचायत सदस्यांनी दिला आहे.

# धानाला प्रतिक्विंटल चार हजार रुपये हमीभाव द्या

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष: तहसीलदारांमार्फत पाठविले प्रधानमंत्री व मुख्यमंत्र्यांना निवेदन



**गोंदिया:** सध्या सर्वत्र महागाई वाढली असून धानाला प्रतिक्विंटल केवळ २१०० रुपये हमीभाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. करिता धानाला प्रतिक्विंटल चार हजार रुपये हमीभाव द्या, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) जिल्हा कार्याध्यक्ष मिथून मेश्राम यांनी केली आहे. यासाठी पक्षाच्या वतीने प्रधानमंत्री व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनानुसार, प्रामुख्याने धान उत्पादक जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी धान लागवड करतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा माजी खासदार शरदचंद्र पवार सत्तेत असताना धानाला प्रतिक्विंटल तीन हजार रुपये हमीभाव दिला होता. सध्या सर्वत्र महगाई वाढली असून खतांसह कीककनाशकांच्या किमतीतदेखील वाढ झाली आहे. पेट्रोल-डिझेलच्या किमतीत वाढ झाल्याने शेत मशागतीच्या खर्चातदेखील वाढ झाली आहे. शेतीच्या खर्चात सातत्याने वाढ होत असून, धान पिकाच्या हमीभावात मात्र अत्यल्प वाढ होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशात शेतकऱ्यांच्या धानाला प्रतिक्विंटल चार हजार रुपये हमीभाव द्या, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना तालुकाध्यक्ष दिनेश कोरे, सरपंच लता गहाणे, राजेश कोरे, देवाचंन तागडे, डायमंड डोंगरे, आशिष येरणे, प्रकाश रहांगडाले, राहूल भोयर, गीता मेश्राम, नितेश खोटेले, गोविंदा पुस्तोडे, गोपाल जमदाड, रोशन खोटेले, राजेश हुकरे, राधे गौतम, धनीराम ब्राम्हणकर, भास्कर मोहुर्ले, दिनेश बागडे, संघर्ष बोलके, धम्मदीप बडोले, कांता गहाणे, जिजा गहाणे, सुनंदा गहाणे, कमला राऊत, धुपद्रा मेश्राम, आशुबाई पुस्तोडे इत्यादी उपस्थित होते.

### काय आहेत मागण्या

**शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना १६ तास वीजपुरवठा करावा, पोलीस पाटील पद भरतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आला. असाच प्रकार कोतवाल पद भरतीमध्ये झाला. निवेदन व आंदोलाचा इशारा देताच फेरपरीक्षा घेऊन त्यावर सारवासारव करण्यात आली. परंतु दोषी उपविभागीय अधिकारी आाणखी जोमाने हाच प्रकार करीत असल्याने पोलीस पाटील पदभरती रद्द करुन उपविभागीय अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे. कंत्राटी पदभरतीचा शासन आदेश रद्द करण्यात यावा. शाळा खाजगीकरणाचा निर्णय रद्द करण्यात यावा. ७५ वर्षाची अट शिथिल करुन शेतकऱ्यांना पट्टे देण्यात यावे. यासह अन्य मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मेश्राम यांनी दिला आहे.**

## जलजीवनच्या कामांत निकृष्ठ साहित्य



**गोरेगाव:** तालुक्यातील जल जीवन मिशनची काम नेहमीच तक्रारीमुळे चर्चेत आहेत. जलजीवन अंतर्गत सुरु असलेले सौरउर्जा पंप, नळ योजनेच्या कामात निकृष्ठ साहित्याचा वापर होत असल्याच्या तक्रारी ग्रामीण भागातून उमटू लागल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या देखरेखीखाली कामे होत असताना देखील कामे निकृष्ठ होत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांची लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

गोंदिया जिल्ह्यात जल जीवन अभियानांतर्गत सौरउर्जा पंप नळ योजनेची ३५० कामे सुरु असून या योजनेसाठी गोरेगाव तालुक्यातील ५२ ग्रामपंचायतींची यादी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आली आहे. त्यामध्ये सौरऊर्जेद्वारे २५ ग्रामपंचायतीमध्ये पंप नळ योजना आहे.

योजनेची कामे सुरु आहेत. मात्र कामाचा दर्जा निकृष्ठ असल्याने बहुतांश गावांमध्ये कामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. जिल्हा परिषद जलजीवन अभियानांतर्गत निधी प्रत्येक कामासाठी ८ लाख रुपये खर्च करावयाचे आहेत. येथील कामाच्या नियोजनानुसार प्रत्येक योजनेवर ५ हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बसवावी त्यातून सुमारे ६० नळ जोडण्यांचे वितरण होईल. परंतु बहुतांश ठिकाणी खेड्यापाड्यात घराघरात पाणी पोहोचत नाही. जास्तीत-जास्त पैसा वाचवण्यासाठी ठेकेदार निकृष्ठ साहित्याचा वापर करीत आहेत. त्यामुळे ही योजना तालुक्यात फ्लॉप होत असल्याचे दिसून येत आहे.

**जल जीवन अभियानांतर्गत सुरु असलेल्या तालुक्यातील सर्व कामांवर देखरेख करण्यात येत आहे. कंत्राटदारांना आयएसआय चिन्हांकित साहित्य वापरण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तक्रार आल्यास चौकशी करण्यात येईल. ती कामे पुन्हा करुन घेण्यात येतील.**

**प्रशांत टेंभुर्णीकर,**
**पा.पु.अभियंता**

साप्ताहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.२५ ऑक्टोबर २०२३ 

# बालरोगतज्ञ आणि परिचारिकांसह सुमारे २०० पदे वर्षानुवर्षे रिक्त



**गोंदिया :** शासकीय रुग्णालयांचे नाव घेताच असंख्य समस्या डोळ्या समोर येतात. गोंदिया जिल्ह्यातील ११ ग्रामीण रुग्णालयांमध्ये अनेक वर्षांपासून डॉक्टर, बालरोगतज्ज्ञ आणि परिचारिकांची शेकडो पदे रिक्त असल्याची धक्कादायक माहिती आरोग्य विभागाकडून समोर आली आहे. या रिक्त पदांमुळेच रुग्णांवर वेळेवर उपचार होत नाहीत. त्यामुळे रुग्णांना गोंदिया किंवा खासगी रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत आहे.

गोंदिया जिल्हा रुग्णालयाच्या नियंत्रणाखाली गोरेगाव, सडक अर्जुनी, अर्जुनी मोर., देवरी, सालेकसा, आमगाव, गोंदिया, तिरोडा या तालुक्यात १ जिल्हा रुग्णालय, १ जिल्हा महिला रुग्णालय, १ उपजिल्हा रुग्णालय आणि १० ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत. या रुग्णालयांमध्ये प्रथम श्रेणी डॉक्टरांची २२ पदे मंजूर आहेत. यापैकी केवळ ३ पदे भरण्यात आली आहेत. बालरोग तज्ज्ञांची ११ पदे मंजूर आहेत. यापैकी केवळ २ पदे भरण्यात आली आहेत. द्वितीय श्रेणी डॉक्टरांची ९२ पदे मंजूर असली तरी प्रत्यक्षात केवळ ५४ पदे भरण्यात आली आहेत. त्यापैकी १९ डॉक्टर कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत. अशाच प्रकारे परिचारिकांची सुद्धा ३०६ पदे मंजूर आहेत. मात्र केवळ ११६ पदे भरली आहेत. तांत्रिक कर्मचाऱ्यांची १२५ पदे मंजूर झाली असली तरी केवळ ५६ पदे भरण्यात आली आहेत. अश्या प्रकारे गोंदिया ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये शेकडो पदे रिक्त आहेत.

रिक्त पदे असूनही चांगली सेवा देण्याचा प्रयत्न रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. त्यामुळे रुग्णांचे कुटुंबीय गोंदिया किंवा खासगी रुग्णालयात जाऊन उपचारासाठी दारोदारी भटकत राहतात. मोठ्या प्रमाणात रिक्त पदे न भरल्याने उपलब्ध कार्यरत डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त काम करावे लागत आहे. या सगळ्यामुळे त्याच्याही अडचणी वाढल्या आहेत. अशीच समस्या गेल्या ५ वर्षांपासून सातत्याने कायम असल्याचे सांगण्यात येत आहे.

## मुंडीकोटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत मोडकळीस

**तिरोडा तालुक्यातील मुंडीकोटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झाल्यामुळे सध्या इमारतीला कुलूप लावून हे आरोग्य केंद्र डॉक्टरांच्या क्वार्टरमध्ये सुरू आहे. मुंडीकोटा येथे एक प्राथमिक आरोग्य केंद्र असून परिसरातील १२९ गावे या केंद्राच्या अंतर्गत येतात. या केंद्रात २ वैद्यकीय अधिकारी आणि इतर १५ कर्मचारी आहेत. या आरोग्य केंद्राची इमारत पूर्णपणे जीर्ण झाली आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात इमारतीतून पाणी टपकते. हे आरोग्य केंद्र मोडकळीस आलेली इमारत असल्याने बंद आहे. त्यामुळे तेथे कुणी जात नाही. गेल्या चार महिन्यांपासून हे आरोग्य केंद्र डॉक्टरांच्या निवासस्थानी हलवण्यात आले आहे. मात्र याठिकाणी जागेअभावी रुग्णांची मोठी अडचण होत आहे. रुग्णसंख्येच्या तुलनेत या तिमाहीत दोनच खाटा आहेत. या आरोग्य केंद्राच्या ओपीडीमध्ये सध्या १०० ते १५० रुग्ण येत असल्याने परिसरात तापाचा उद्रेक होत आहे. मात्र पुरेशा जागेअभावी रुग्णांची अडचण होत आहे. त्यामुळे या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी इमारत बांधण्याची मागणी जि.प.सदस्य किरण पारधी यांनी शासनाकडे केली आहे.**

# हुतात्मा पोलिस जवानांपासून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी-जिल्हाधिकारी गोतमारे



**गोंदिया:** वेळोवेळी कर्तव्य पथावर अग्रेसर असताना लोकतंत्र रक्षणार्थ आपल्या जीवनाची पर्वा न करता आपला, आज देशवासीयांच्या उद्यासाठी ही कृती प्रत्यक्षात उतवून हसत खेळत स्वत:चे प्राण अर्पण केले. अशा हुतात्मा पोलिस जवानांपासून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले. कारंजा येथील पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर शनिवारी (दि.२१) आयोजित पोलिस स्मृतीदिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पोलिस अधीक्षक निधील पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील ताजणे, अति कार्यकारी पोलिस उपअधीक्षक योगिता चाफले, भारत राखीव बटालीयन-२ व राज्य राखीव पोलिस बल गट क्र.१५ चे समादेशक सहायक कैलास पुसाम व सहायक समादेशक कमलकांत सिंग तसेच जिल्हा पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार व शहीद झालेल्या पोलिसांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे व पोलिस अधीक्षक निखील पिंगळे व उपस्थितांनी हुतात्मा पोलिस हुतात्मा स्मारकास आदरांजली वाहिली. प्रसंगी सहायक पोलिस निरीक्षक तुषार काळेल, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे यांनी १ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत देशात कर्तव्य बजावितांना शहीद झालेल्या १८८ पोलिस अधिकारी व जवानांची नावे वाचून दाखविली. दरम्यान, जिल्हा पोलिस दलाच्या प्लाटून तिरोडाचे कमांडर पोउपनि विजयकुमार पुंडे, भारत राखीव बटालीयन-२, राज्य राखीव पोलिस दल गट क्र.१५ चे प्लाटून कमांडर पोउपनि नरेंद्र परिहार व त्यांच्या अंमलदारांसह रापोनि रमेश चाकाटे यांनी हुतात्मा पोलिसांना हवेत तीन राऊंड फार करुन सलामी दिली.

### यांनी घेतले परिश्रम

**पोलीस स्मृतीदिन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोलिस निरीक्षक रमेश चाकाटे, सफौ रोशन उईके, पोहवा युवराज किरसान, राजेश पटले, नैलेश शेंडे, राज वैद्य, राजू डोंगरे, नापोकॉ वसीम शेख तसेच पोलिस मुख्यालय गोंदिया येथील डी.आय.स्टाफ यांनी परिश्रम घेतले.**

# बुकी सोंटू जैनची नव्याने चौकशी होणार, शुक्रवारपर्यंत पोलीस कोठडी

**नागपूर :** आंतरराष्ट्रीय बुकी सोंटू ऊर्फ अनंत जैनला शनिवारी न्यायदंडाधिकारी न्यायायलाने शुक्रवारपर्यंत (२७ ऑक्टोबर) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेत. बुकी सोंटू जैनची नव्याने चौकशी करण्यात येणार आहे.

शनिवारी सोंटूची पोलीस कोठडी समाप्त झाल्यामुळे गुन्हे शाखेने त्याला न्यायालयात हजर केले. या बनावट ऑनलाईन गेमींग ॲप फसवणूक प्रकरणाचा चौकशी तपास करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयाला ९ दिवसांच्या पोलीस कोठडीची विनंती केली होती. परंतु न्यायालयाने सोंटूला २७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी दिली. आता पुन्हा २७ ऑक्टोबरपर्यंत कोठडी मिळाल्याने पोलीस सोंटूची नव्या पद्धतीने कसून चौकशी करणार आहे. १६ ऑक्टोबरला दुपारी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी उके यांच्यासमक्ष सोंटूने आत्मसर्मपण केले होते.

सोंटूला मदत करणारे आरोपी बँक व्यवस्थापक अंकेश खंडेलवाल आणि डॉ.गौरव बग्गा या दोघांनाही अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयाने ८ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. हे दोघेही सोंटूचे मित्र असून त्यांनी सोंटूच्या बँक लॉकरमधून सोने आणि पैसे काढले होते. ते सर्व डॉ. बग्गा याची पत्नी डॉ. गरीमा बग्गा हिच्या नावाचे नव्याने उघडलेल्या बँक लॉकरमध्ये ठेवले होते. हा उलगडा सोंटूने पोलिसांकडे जमा केलेल्या मोबाईलमधून झाला आहे.

ऑनलाइन गेमिंग फसवणूक प्रकरणात सोंटू जैनला आर्थिक व्यवहारात मदत करणाऱ्या डॉ.गौरव बग्गा आणि ॲक्सिस बँक शहर शाखेचे व्यवस्थापक अंकेश खंडेलवाल यांच्या घरावर नागपूर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी केली होती.यात डॉ. बग्गांच्या घरुन १ कोटी ३४ लाख रोकडसह ३ किलो २०० ग्रॅम सोन्याची बिस्कीटे जप्त करण्यात आली.

पोलिसांनी डॉ. गौरव बग्गासह त्याची पत्नी डॉ. गरीमा बग्गा, सोंटूची आई कुसुमदेवी जैन, भाऊ मोंटू जैन, वहिणी श्रद्धा जैन यांच्याविरुद्ध गिट्टीखदान पोलीस ठाण्यात नव्याने गुन्हा दाखल केला आहे. तसेच सोंटूचा मित्र बंटी कोठारी यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शुक्रवारी रात्री ॲक्सिस बँक व्यवस्थापक अंकेश खंडेलवाल, डॉ. बग्गा आणि बंटी कोठारी यांना पोलिसांनी अटक केली.

सोंटूने मोबाईलमधील सर्व डेटा उडवला होता. परंतु पोलिसांनी उच्च तंत्रज्ञानाचा अवलंब करून २०० मिनिटांच्या ८ कॉल रेकॉर्डिंगसह इतर माहिती मिळविली. हे कॉल रेकॉर्डिंग अंकेश खंडेलवाल, गोंदिया वैद्यकीय महाविद्यालयात कंत्राटी रेडिओलॉजिस्ट डॉ. बग्गा यांच्यातील आहे.

गोंदियातील ॲक्सिस बँक शाखेत डॉ. बग्गा यांच्या नावाने ३ नवीन लॉकर्स उघडण्यात आले. व्यवस्थापक अंकेश खंडेलवाल यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात सोंटू जैनच्या सूचनेनुसार एका व्यक्तीला सोन्याने आणि रोखीने भरलेल्या ३ बॅग दिल्याचे उघड झाले. तिन्ही बॅग्स गोंदिया येथील बंटी कोठारी याच्याकडे सापडल्याचे सोंटूने पोलिसांना सांगितले.



### डॉ. बग्गा बडतर्फ

**दरम्यान, बुकी सोंटू जैन प्रकरणात डॉ. बग्गा यांचे नाव आल्याची माहिती आम्हाला लेखी स्वरुपात मिळाली. त्यानुसार आम्ही गोंदिया वैद्यकीय महाविद्यालयात कंत्राटी पद्धतीने कर्तव्यावर असलेल्या डॉ. गौरव बग्गा यांना बडतर्फ केले आहे. त्यांची पत्नी डॉ. गरिमा बग्गा यांच्याबद्दल कोणतीही माहिती पोलिसांनी सध्या तरी दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, त्या स्थायी आहेत. पोलिसांनी आम्हाला लेखी माहिती दिली तर त्यांच्यावरही विभागीय कारवाई करण्यात येईल, असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कुसुमग्रज घोरपडे यांनी सांगितले.**



# विद्युत प्रवाहाद्वारे वाघाची शिकार, शिर व तीन पंजे गायब

**गडचिरोली :** विद्युत प्रवाहाद्वारे वाघाची शिकार केल्याची धक्कादायक घटना चातगाव वनपरिक्षेत्रातील अमिर्झा बिटात मंगळवार २४ ऑक्टोबररोजी उघडकीस आली.

घटनास्थळी आढळलेल्या मृत वाघाचे शिर व तीन पंजे गायब होते. रानटी डुकराच्या शिकारीसाठी हा सापळा रचण्यात आला होता पण त्यात वाघ अडकल्याचा प्राथमिक अंदाज वनविभागाने वर्तवला आहे.

गडचिरोली वन विभागांतर्गत येणाऱ्या चातगाव वनपरिक्षेत्रात गेल्या अनेक महिन्यांपासून वाघाचा वावर आहे. परिसरातील नागरिकांना अधूनमधून या वाघाचे दर्शन होत होते.

दरम्यान, मंगळवारी सकाळच्या सुमारास जंगलात गेलेल्या गुराख्याला वाघ मृतावस्थेत आढळून आला. त्याने गावात याबद्दल माहिती दिली असता तात्काळ वनाधिकाऱ्यांना कळविण्यात आले. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून पण पंचनामा केला. यावेळी मृत वाघाचे तीन पंजे व शिर गायब होते.

दरम्यान, गडचिरोली वन विभागाचे उपवनसंरक्षक मिलिश शर्मा यांनी घटनास्थळ गाठून पाहणी केली. यावेळी सहायक वनसंरक्षक संकेत वाठोरे व वन विभागाने अधिकारी उपस्थित होते.

# धान कापणीला गेलेल्या महिलेवर हल्ला करणारी वाघिण जेरबंद

**नागपूर :** मौजा रामाळा येथील शेतशिवारात धान कापणीसाठी गेलेल्या महिलेवर हल्ला करुन तिचा बळी घेणाऱ्या टी-१३ वाघिणीला मौजा मुलुरचक येथे जेरबंद करण्यात वनखात्याला यश आले. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे व नेमबाज अजय मराठे यांच्या चमूने ही कामगिरी केली. मानव-वन्यजीव संघर्षात आतापर्यंत ६० वाघांना त्यांनी जेरबंद केले.

वाघिणीला जेरबंद करण्यासाठी सापळा रचून कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले. अवघ्या तीन दिवसांत वाघिणीला जेरबंद करण्यात यश आले. या वाघिणीला गोरेवाडा बचाव केंद्रात आणण्यात येत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील वनसंरक्षक एस. रमेशकुमार यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई पार पडली. यावेळी वडसा उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सहाय्यक वनसंरक्षक संदिप भारती, वनपरिक्षेत्र अधिकारी पवनकुमार जोंग, अविनाश मेश्राम, क्षेत्र सहाय्यक राजेंद्र कुंभोर, अजय उरकुडे आदी सहभागी होते.तसेच वाघिणीला जेरबंद करणाऱ्या चमुमध्ये दिपेश टेंभूर्णे, योगेश लाकडे, गुरुनानक ढोरे, वसीम शेख, विकास ताजने, प्रफुल वाटगुरे, निकेश शेंदे, मनान शेख तसेच गडचिरोली जलद बचाव पथकातील आशिष भोयर, अजय कुकडकर, मकसुद सय्यद, गुणवंत बावनथडे, पंकज फरकाडे, निखील बारसागडे व इतर वनकर्मचारी उपस्थित होते.



# रेल्वेचे रिले वायर चोरणारे अटकेत

**गोंदिया :** गंगाझरी पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या दांडेगाव येथील लेव्हल रेल्वे क्रॉसिंग गेट ५१५ येथील रिले रुमचे कुलूप तोडून रेल्वे रॅक मधील ४१ रिले चोरी करणाऱ्या तिघांना गंगाझरी पोलिस व रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी संयुक्तरीत्या कारवाई करुन अटक केली. ही कारवाई १५ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. सलाम रफिक शेख (२४), जितेंद्र ऊर्फ जितू नरेंद्र गिरी (३४), ऋषभ ऊर्फ सोनू शशिकांत सिंह (२४) सर्व रा. गंगाझरी असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. सोबतच एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेतले.

प्राप्त माहितीनुसार १४ ऑक्टोबर रात्री ११:३० वाजताच्या सुमारास चोरट्यांनी लेव्हल रेल्वे क्रॉसिंग गेट ५१५, दांडेगाव येथील रिले रुमचे कुलूप तोडून रेल्वे रॅक मधील ४१ रिले किंमत ९८ हजार रुपयांचा माल चोरुन नेला होता.

या आरोपींवर गोंदिया रेल्वे सुरक्षा बल येथे आरोपींवर रेल्वे मालमत्ता (अवैध ताबा) कायदा १९६६ कलम ३ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही कारवाई पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस स्टेशन गंगाझरीचे पोलिस निरीक्षक महेश बन्सोडे, सहायक फौजदार मनोहर अंबुले, पोलिस हवालदार सुभाष हिवरे, भूपेश कटरे, पोलिस शिपाई प्रशांत गौतम, रेल्वे सुरक्षा बलाचे पोलिस निरीक्षक अनिल पाटील, नंदबहादूर, विनोदकुमार तिवारी, पोलिस उपनिरीक्षक राहुल कुमार, दुबे, मेश्राम, सहायक फौजदार एस. सिडाम, पोलिस हवालदार रायकवार, पोलिस शिपाई नसीर खान यांनी केली. घटनास्थळाला रेल्वे सुरक्षा बलाचे डी.आय.जी भवानी शंकरनाथ व मंडल सुरक्षा आयुक्त आर्य यांनी भेट दिली.



### वाहतूक व्यवस्था खोळंबली

**रेल्वेच्या महत्वपूर्ण सिग्नल प्रणालीच्या रिले चोरीच्या घटनेमुळे काही काळाकरिता हावडा-नागपूर रेल्वे मार्गावरील रेल्वेची वाहतूक व्यवस्था खोळंबली होती. या कृत्यामुळे रेल्वेची मोठी दुर्घटना होता होता थोडक्यात टळली.**

### रिलेचे कार्य काय?

**रिले हे रेल्वेच्या सिग्नल प्रणालीमध्ये वापरले जातात. त्याच्यामुळे सिग्नलचे कार्य चालू राहते. परंतु ते रिले सिस्टीम मधून काढल्यामुळे रेल्वेचे सर्व सिग्नल बंद पडले. यामुळे एखादी मोठी रेल्वे दुर्घटना घडून त्यात मोठी जीवित किंवा वित्तहानी झाली असती. परंतु रेल्वे प्रशासनाच्या सतर्कतेमुळे ही घटना टळली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या निर्देशानुसार गंगाझरीचे पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी तत्परतेने चोरट्यांबद्दल माहिती संकलित करून गुप्त बातमीदार यांच्याकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींना ताब्यात घेण्यात आले.**

### नागरिकांना आवाहन

**रेल्वेच्या मालमत्तेची किंवा त्याच्या वेगवेगळ्या साहित्याची चोरी करणे हा अतिशय गंभीर गुन्हा आहे. अशा प्रकारच्या रेल्वेच्या साहित्याच्या चोरीमुळे रेल्वेची मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे रेल्वेच्या मालमत्तेची चोरी केल्याचे वा करताना आढळून आल्यास त्याबद्दल तत्काळ गोंदिया रेल्वे पोलिसांना तसेच गोंदिया जिल्हा पोलिसांना माहिती देणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. जिल्ह्यातील सुज्ञ नागरिकांनी नियंत्रण कक्ष गोंदिया दूरध्वनी क्रमांक ०७१८२-२३६१०० यावर किंवा डायल ११२ यावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी केले आहे.**

# ३३ टक्के, एकदम ओक्के!ताई, तुम्ही काय बनणार खासदार की आमदार


## जिल्हा निर्मितीनंतर २४ वर्षांत एकाही महिलेला मिळाली नाही संधी

**गोंदिया:** १ मे १९९९ ला गोंदिया जिल्हा निर्मितीनंतर २४ वर्षांत एकही महिला विधानसभा, लोकसभेच्या सभागृहात पोहोचू शकली नाही. मात्र, लोकसभा व विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासंदर्भातील महत्वाचे विधेयक मंजूर झाल्याने आता महिला नेतृत्वाच्या आशा-आकांक्षा उंचावल्या आहेत.

आदिवासी व दुर्गम समजल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्यातील लोकसभेची एक, विधानसभेच्या चार जागा आहेत. या जिल्ह्याने आमदार, खासदारांसह मंत्रीपदाच्या रुपाने राज्याच्या कारभारात मानाचे स्थान मिळवले; पण महिला नेतृत्वाला एकदाही संधी उपलब्ध होऊ शकली नाही. विशेष म्हणजे, महत्वाच्या राजकीय पक्षांनी खूप कमी वेळा महिला उमेदवारांना निवडणूक लढविण्याची संधी दिली; पण दुदैवाने त्यांचा निभाग लागू शकला नाही. मिनी मंत्रालय व नगरपालिकेत मात्र महिलांनी कारकीर्द गाजवली. आता ३३ टक्के आरक्षणामुळे समीकरणे बदलण्याची चिन्हे असून, महिला नेत्यांना वाव मिळेल. अंमलबजावणी झाल्यास जिल्ह्यातून पहिल्यांदाच महिला नेतृत्वाला संधी मिळेल.

**जातनिहाय जनगणना**

नारीशक्ती वंदन विधेयक मंजूर करताना जातनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा चर्चेत आला. त्यामुळे जातनिहाय जनगणना झाल्याशिवाय या विधेयकाची अंमलबजावणी होईल का? असा प्रश्न आहे. त्यामुळे ज्या महिलांना लोकसभा, विधानसभेचे वेध लागले आहेत. त्यांना २०२४ मध्ये संधी मिळण्याची शक्यता कमीच असल्याची राजकीय वर्तूळात चर्चा आहे.



### जिल्हा निर्मितीपुर्वी मिळाली होती दोन महिलांना संधी



**गोंदिया जिल्ह्याची निर्मिती होण्यापुर्वी जिल्ह्यातून सुशिला केशवराव इंगळे यांनी पतीच्या निधनानंतर १९५७ ते १९६२ या कालावधीत आमगाव विधानसभा क्षेत्रातून नेतृत्व केले होते. तर विधान परिषद सदस्य डॉ. गोपाल नारायण बाजपेयी यांची पत्नी राजकुमारी वाजपेयी यांनी विधानसभेत नेतृत्व केले होते.**

### मंत्रीपदावर अनेकांनी लावली होती मोहर



**जिल्ह्यातील आदिवासी व बिगर आदिवासी महिला नेतृत्वाला विधान परिषद किंवा राज्यसभेवरही संधी मिळाली नाही; पण मंत्रीपदावर छेदीलाल गुप्ता, केवलचंद जैन, महादेवराव शिवणकर, भरतताऊ बहेकार, राजकुमार बडोले यांनी आपला ठसा उमटविला होता.**

### जि.प.पर्यंतच मजल

**जिल्ह्यातील महिलांना राज्य, देश पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही. मात्र काही महिलांनी जिल्हा परिषदेसह नगरपालिकामध्ये सत्तासुत्रे सांभाळली. रजनी नागपुरे या जि.प.च्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या तर सरला भारद्वाज या गोंदिया नगरपरिषदेच्या पहिल्या महिला नगराध्यक्ष होत.२४ वर्षात विधानसभेत १० महिलांनी आपले नशीब आजमावल्याची नोंद आढळून येते.**



**स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. त्यामुळे महिलांना आपल्यातील नेतृत्वगुण सिद्ध करण्याची मोठी संधी मिळाली. आता लोकसभा व विधानसभेतही महिला नेत्यांचा टक्का वाढणार आहे. त्यामुळे या निर्णयाचा महिला म्हणून अभिमान वाटतो. जिल्ह्यात तीनपैकी एका जागेवर आता महिला नेतृत्व तयार होईल.**

**-माधुरी रहांगडाले,** जि.प.सदस्या



**महिलांचे प्रश्न महिलाच अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकतात. त्यामुळे या निर्णयाचा महिलांचे प्रश्न संवेदनशीलपणे सुटण्यासाठी नक्कीच उपयोग होईल. महिलांना अधिकाधिक संधी मिळाव्यात. यासाठी सरकारने उचललेले हे महत्वाचे पाऊल आहे. यामुळे गोंदियासारख्या जिल्ह्यातून महिला नेतृत्व तयार होणार आहे.**

**माधुरी नासरे,** शहराध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी



**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महिलांना आधीच ५० टक्के आरक्षण आहे. त्यामुळे आगामी निवडणूका डोळ्यासमोर ठेवून ३३ टक्के आरक्षणाचे विधेयक मंजूर करुन सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेऊ नये, महिलांना संधी द्यायचीच होती तर नऊ वर्षे तुम्ही सत्तेत होता. आताच महिलांना न्याय दिल्याचा गवगवा कशासाठी.**

**वंदना काळे,** जिल्हाध्यक्ष महिला कॉंग्रेस कमिटी

# विशेष ॲपच्या निगराणीत होते आरोग्य तपासणी

## आरोग्य विभागाचे निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे अभियान

**गोंदिया:** सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्ह्यात आयुष्यमान भव मोहीम १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे अभियानातून १८ वर्षावरील पुरुषांची आरोग्य तपासणी मोहीम चार महिन्यात राबविण्यात येणार आहे. यामध्ये विशेष ॲपच्या निगराणीत आरोग्य तपासणी केली जात आहे.

निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे अभियानातून १८ वर्षावरील पुरुषांची आरोग्य तपासणी मोहीम जिल्हाभर राबविण्यात येत आहे. यासाठी साप्ताहिक आरोग्य मेळावे व विविध गावनिहाय तपासणी शिबिर आयोजित केले जात आहे. शिबिरादरम्यान मधुमेह, रक्तदाब, क्षयरोग, असंसर्गजन्य आजार, सिकलसेल, मानसिक आजार, कुष्ठरोग, संसर्गजन्य आजारांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच पोषण आहार, टेलिकन्सलटेशन, ई-संजीवनी ओपीडी, लसीकरण, निक्षयमित्र याबाबत प्रतिबंधात्मक जनजागृती केली जात आहे. जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, नागरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र,आपला दवाखाना, आयुर्वेदिक दवाखाना अशा विविध आरोग्य संस्थांतून पुरुषांची तपासणी केली जात आहे. तसेच आवश्यक शस्त्रक्रिया लाभार्थींना वैद्यकीय महाविद्यालय येथे संदर्भसेवा करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली आहे.



### चाचन्या होणार मोफत

**जिल्ह्यातील ३० वर्षावरील सर्व पुरुषांची आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, उपचार मोफत करण्यात येणार आहे. गरजेनुसार गंभीर आजारी रुग्णांना प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व राज्य शासनाच्या महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या अंगीकृत रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. १८ वर्षावरील पुरुषांनी जवळील आरोग्य संस्थेत जाऊन तपासणी करुन घ्यावी असे कळविण्यात आले आहे.**

